# साहित्य

मे–जून–जुलै २०२२



'बुकर' पुरस्काराने सन्मानित, 'रेत समाधी'च्या लेखिका गीतांजली श्री

**अभिनंदन**

# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

## मे–जून–जुलै २०२२

संपादक

**नारायण लाळे**

सहसंपादक

रेखा नार्वेकर

प्रकाशक

उज्ज्वला मेहेंदळे

मुखपृष्ठ / आतील चित्र / मुद्रितशोधन : सौजन्य – ग्रंथाली

अक्षरजुळणी : ग्रंथाली छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई–४०००३१

■ मूल्य तीस रुपये. वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/–
द्वैवार्षिक वर्गणी रु. ४००/–

■ धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावे असावा.

■ NEFT S/B A/C No. 002200100046717
IFSC : SRCB0000002
Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum



**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : २३८७६१५८, २३८५६३०३

इमेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in

वेबसाइट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** १०४, सीतामाई, अयोध्या नगरी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ ● (मो. ९९८७९२४१९९)



या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# साहित्य : मे-जून-जुलै २०२२

## अनुक्रम


- संपादकीय / २
- लेख - अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ / ३
  प्रा. उषा तांबे
- लेख - आकाशभर एकाकीपणाची निवांत सावली / १२
  डॉ. महेश केळुसकर
- लेख - ज्ञानेश्वरी.. निर्मितीप्रक्रिया / १६
  प्रा. अशोक बागवे
- ललितलेख - माझिया दारात चिमण्या आल्या / २२
  रश्मी कशेळकर
- ललितलेख - एक समंजस काळोख / ३१
  सतीश सोळांकुरकर
- कथा - हंबरडा / ३५
  मनीष पाटील
- **कविता –** कल्पना मलये, दमयंती भोईर, प्रमोद मनोहर कोपर्डे,
  अनुपमा निरंजन उजगरे, कल्पना दुधाळ, अंजली चितळे / ४२
- पुस्तक परिचय - चैत्रेय, आशय परिवार, सोन्याचा धूर, वेदनेची वीणा / ४५
  राजीव जोशी
- अभिप्राय - अशोक लोटणकर, चित्रा वाघ / ३०
- पुरस्कार, अभिनंदन, नवे काही / १०, ५५, ५६
- कार्यवृत्तान्त - अशोक बेंडखळे / ५७
- साभार पोच / ५९
- श्रद्धांजली / ५८

# संपादकीय

'बॉर्डर मिलनकी रेखा है' असे, 'रेत समाधी' या हिन्दी साहित्य कृतीतून विश्वविधान करणाऱ्या, भारतीय हिन्दी लेखिका गीतांजली श्री यांना २०२२च्या 'इंटरनॅशनल बुकर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनुवादासाठी मिळणारा हा पुरस्कार त्यांच्या 'रेत समाधी' या पुस्तकाच्या 'Tomb of Sand' या इंग्लिशमध्ये अनुवादित झालेल्या पुस्तकाला मिळाला आहे. हिन्दी, उर्दू भाषेच्या अभ्यासक डेजी रॉकवेल या अनुवादिकेने हा अनुवाद केला आहे. गीतांजली श्री या पहिल्या भारतीय हिन्दी भाषिक लेखिका आहेत, ज्यांना 'बुकर' पुरस्कार मिळाला आहे. गीतांजली श्री यांचे मन:पूर्वक अभिनंदन त्याचप्रमाणे डेजी रॉकवेल यांचेही अभिनंदन.

गीतांजली श्री यांच्या साहित्य कृतीतील भाषाशैलीचा उल्लेख विशेषत्वाने केला जातो. लहान, लहान अर्थवाही वाक्य, सोपी भाषा, हिन्दी भाषेतील कित्येक अनोखे शब्द, आणि काही लुप्त झालेल्या शब्दांना लेखिकेने उजागर केले आहे. सोप्या शब्दांतून गंभीर आशय व्यक्त करणारी 'रेत समाधी' ही कादंबरी आहे, असे म्हटले जाते.

'रेत समाधी'च्या इंग्लिश भाषा अनुवादक, डेजी रॉकवेल म्हणतात, मी प्रत्येक उताऱ्याचा पाच पाच वेळा अनुवाद करून बघायचे. शब्दाला शब्द असे ट्रान्सलेशन मी कधीच केले नाही, तर मी वाचकांच्या भाषेत अनुवाद करते!

बुकर अवॉर्डच्या निमित्ताने माहितीच्या महाजालात एक माहिती, ज्यांना माहीत नसेल अशा मराठी लेखकांसाठी देत आहे. बुकर अवॉर्डसाठी कुणाला पुस्तक सबमिट करायचे झाल्यास, अनेक अटींपैकी दोन अटी महत्त्वाच्या आहेत. पैकी तुमच्या पुस्तकाचा इंग्लिश अनुवाद कंपलसरी आहे आणि तुमचे पुस्तक ब्रिटनमध्ये प्रकाशित होणे अत्यावश्यक आहे. हिन्दी लेखिका गीतांजली श्री आणि अनुवादक डेजी रॉकवेल यांचे अभिनंदन करतानाच आपल्या मराठी लेखकांनाही मी 'बुकर' पुरस्कारासाठी शुभेच्छा देतो.

हिन्दी साहित्यक्षेत्राला गौरवास्पद ठरेल अशा या घटनेचे अगदी विरुद्ध टोक मराठी साहित्यक्षेत्रात सापडले आहे, असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. ती घटना म्हणजे, काही तथाकथित मराठीच्या 'प्रां'नी पीएच.डी. प्रमोशनच्या विकृत ध्यासापोटी 'कविता–रती'चा एक बनावट अंक छुपेपणाने छापून घेतला, त्यात स्वत:चे ५–६ मार्कांसाठीचे लेख परस्पर गैरव्यवहाराने छापून घेतले. पीएच.डी., प्रमोशनसाठी बनावट अंक छापून घेणाऱ्या तथाकथित प्राध्यापकांच्या या लांछनास्पद कृत्याचा मी निषेध करतो.

मराठी साहित्यक्षेत्रात नुकतीच घडलेली एक दु:खद घटना म्हणजे, कवयित्री रजनी परुळेकर हिचे निधन. स्वत:ची कविता आणि स्वत:चेच उद्ध्वस्त जगणे या दोन टोकांना सांधणारी जिवंत रेषा म्हणजे रजनी परुळेकर, असे मला म्हणावेसे वाटते. कवयित्री प्रज्ञा पवार लिहितात, जगणं आणि लिहिणं यात कायमचा एक भक्कम जोड तिने सांधला. (ललित, जून २०२२). कवयित्री रजनी परुळेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– नारायण लाळे**

# अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

## प्रा. उषा तांबे

'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ' असे भारदस्त नाव असलेल्या या साहित्य संस्थेचे कार्यालय १ मे १९२२ पासून मुंबई मराठी साहित्य संघाकडे आलेले आहे. या नावातील 'महामंडळ' या शब्दामुळे ती शासकीय किंवा निमशासकीय संस्था असावी व त्यातील पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका शासन करत असावे, असा अनेकांचा गैरसमज होतो. तो दूर करण्यासाठी या संस्थेची रचना, घटना आणि कार्य समजून घेतले पाहिजे.

न्या. रानडे यांनी १९०६ साली स्थापन केलेली महाराष्ट्र साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था मानली जाते. तिचे कार्यालय प्रथम मुंबईत होते. परंतु मुंबईतील जागेची टंचाई यासह इतर अनेक अडचणींमुळे ती संस्था पुण्यात हलवण्यात आली. १९३५ साली मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना झाली. विदर्भ साहित्य संघ १९२२ पासूनच काम करत आहे. औरंगाबादेत मराठवाडा साहित्य परिषद स्थापन झाली. या संस्था आपापल्या विभागातील प्रातिनिधिक साहित्यसंस्था मानल्या जातात. मात्र प्रदेशांमधील भिन्नतेनुसार त्यांच्या ध्येयधोरणात, कार्यपद्धतींमध्ये, काही फरक होते. मुंबईसारख्या महानगरात अनेकानेक भाषांमध्ये व्यवहार होत असतात. पश्चिम महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठी बोलली जात असली, तरी तिच्या अनेक बोलीभाषा आहेत. विदर्भातील मराठीवर शेजारील मध्यप्रदेशच्या हिंदीचा लक्षणीय प्रभाव आहे. नागपूर ही तर महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंत मध्यप्रदेशची राजधानी होती. मराठवाड्याच्या भाषेवर हैदराबादी संस्थानाची छाप असणे स्वाभाविक आहे. मराठी भाषेचा मूळ स्रोत तेथील असूनही तेथे मराठी भाषेसाठी झगडावे लागत होते.

भाषावार प्रांतरचनेत मराठी भाषकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची स्थापना – इतर भाषिक राज्यांच्या तुलनेत उशिराने का होईना – झाल्यावर या संस्थांचे एकसूत्रीकरण व्हावे असा विचार पुढे आला व म.म. दत्तो वामन पोतदार यांच्या

पुढाकाराने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची १९६१ साली स्थापना झाली. त्यायोगे या चार संस्थांनी मराठी भाषेला एका समान व्यासपीठावर आणले. दत्तो वामन पोतदारांचे सहकारी होते श्री.शं. नवरे आणि वा.रा. ढवळे; मुंबई, ग.त्र्यं. माडखोलकर; नागपूर आणि अनंत भालेराव, नरहर कुरुंदकर आदी औरंगाबाद. या चार मूळ संस्था म्हणजे महामंडळाच्या घटकसंस्था.

परंतु मराठी भाषेची व्याप्ती या चार प्रदेशांपलीकडेही कितीतरी दूरवर आहे. विशेषत: महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या आंध्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा आणि गुजरात या राज्यांमध्ये मराठी साहित्यसंस्था कित्येक वर्षे काम करत आहेत. त्यापैकी संपूर्ण प्रदेशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांना समाविष्ट संस्था तर इतरांना संलग्न संस्था ठरवण्यात आले. त्यांचे महामंडळावरील प्रतिनिधित्व तुलनेने कमी असते, परंतु त्यापैकी एका संस्थेचा प्रतिनिधी उपाध्यक्ष असतो व अध्यक्षांच्या अनुपस्थितीत महामंडळाचे काम चालवतो. यवतमाळ येथील संमेलनात काही कारणांमुळे अध्यक्षांनी राजीनामा दिला, तेव्हा उपाध्यक्ष डॉ. विद्या देवधर यांनी संमेलनाची जबाबदारी सांभाळली होती.

महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय मुंबईत आहे. संमेलननिधीही कायम मुंबईत असतो. एरवी महामंडळाचे कार्यालय दर तीन वर्षांनी एका घटकसंस्थेकडून दुसरीकडे – मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद – या क्रमाने जात आहे. २०२२ ते २०२५ या काळात ते मुंबई मराठी साहित्य संघाकडे असणार आहे. प्रा. उषा तांबे अध्यक्ष, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे कार्यवाह व प्रकाश पागे कोषाध्यक्ष असतील. गोव्याचे रमेश वसकर हे दोन वर्षे उपाध्यक्ष असतील.

वेगवेगळ्या प्रदेशांतील साहित्यव्यवहारात सुसूत्रता असावी म्हणून महामंडळाची स्थापना झाली आहे. त्याच्या कार्यात मराठीच्या परंपरेचे जतन, नवतेला प्रोत्साहन, बोलीभाषांची जपणूक, तरुण साहित्यिकांना उत्तेजन, अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण इत्यादी महत्त्वाच्या, परंतु सतत व सहज नजरेत न भरणाऱ्या बाबींचा समावेश होतो.

मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत. परंतु परस्परसंवादासाठी आणि विशेषत: लेखनासाठी एका प्रमाणभाषेची गरज असते. शहरवासीय मराठी माणसाला त्याच्या मूळ प्रदेशाची बोलीभाषा पूर्णपणे समजेल असे नाही; किंवा एका उपप्रदेशाची बोलीभाषा (उदाहरणार्थ, कोकण) दुसऱ्या उपप्रदेशातील (उदाहरणार्थ, विदर्भ) लोकांना समजेल असे नाही. त्यांच्यामध्ये संवाद होण्यासाठी एका प्रमाणभाषेची निश्चितच आवश्यकता आहे. तिला 'शुद्ध' म्हणून इतर बोलींना अशुद्ध ठरवणे निश्चितच गैर आहे. त्याचबरोबर प्रमाणभाषेचे नियम ठरवणे हेही आवश्यक आहे. हे काम महामंडळाने केलेले आहे. सध्या मराठीत प्रचलित असलेले नियम महामंडळाने, तज्ज्ञांच्या

मार्गदर्शनाखाली तयार केलेले आहेत.

सीमेवरील मराठी भाषकांच्या अधिकारासाठी लढा, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न अशी काही महत्त्वाची कामे महामंडळाने केलेली आहेत. प्रतिवर्षी संस्थेतर्फे 'अक्षरयात्रा' हे अतिशय दर्जेदार वार्षिक प्रकाशित होत असते. प्रत्येक वार्षिक एका महत्त्वाच्या वाङ्मयीन विषयावर चर्चा घडवून आणते. 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि आजचे वास्तव', 'मराठीतील ललित गद्यविचार आणि विस्तार', 'नव्वदनंतरची मराठी कविता : अभिव्यक्ती आणि आस्वाद' ही त्यातील काही उदाहरणे. मात्र हे प्रकाशन रसिकांपर्यंत पुरेसे पोचत नाही, हे खरे आहे.

परंतु महामंडळाचे सर्वात दृश्य स्वरूपाचे, नजरेत भरणारे/खुपणारे कार्य म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. महामंडळाच्या घटनेत 'कार्य' या विषयाखाली 'शक्यतो दरवर्षी मराठी भाषक जनतेचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करणे' असे लिहिले आहे. सुरुवातीला साधेपणाने साजरी होणारी ही संमेलने आता भव्य-अतिभव्य होऊ लागली आहेत. हजारो श्रोते बसतील असा मुख्य मंडप, इतर छोटे मंडप, पुस्तकप्रदर्शनातील २५०-३०० गाळे, भोजनव्यवस्था, वाहनतळ, निवासव्यवस्था - दडपून टाकणाऱ्या ह्या व्यवस्था होत चालल्या आहेत. त्यासाठी शासनाची मदत असते तरीही यजमान संस्थेला भरपूर निधी गोळा करावा लागतो व इथेच प्रश्न निर्माण होतात.

संमेलनाला शासनाचीही मदत लागू नये म्हणून २००१ साली संमेलननिधीची स्थापना करण्यात आली. त्या निधीच्या व्याजातून संमेलन करावे, अशी कल्पना होती. परंतु त्याला अत्यल्प प्रतिसाद मिळाला. गेल्या वीस वर्षांमध्ये केवळ दीड कोटी रुपये एवढा निधी गोळा झाला. त्यात दरवर्षी संमेलनाच्या यजमान संस्थेकडून येणाऱ्या देणगीचा मोठा वाटा आहे. संमेलनाला येणाऱ्या लोकांनी निदान दहा रुपये तरी द्यावेत म्हणून आम्ही २०१० साली ठाण्यात ठिकठिकाणी दानपेट्या ठेवल्या. मांडवात दानपेट्या फिरवल्यासुद्धा. हजारोंनी लोक आले पण सर्व मिळून केवळ तीस हजार रुपये जमा झाले. हा अनुभव धक्कादायक होता. कोणाकडून मोठे दान घ्यावे, तर दात्याचा पैसा कुठून आला हे शोधावे लागते!

मुळात, एवढे उत्सवी संमेलन असावे का? १९२८ साली ग्वाल्हेरच्या संमेलनात मा.श्री. अणे म्हणाले होते, ''साहित्य संमेलन म्हणजे श्री शारदादेवीच्या वाङ्मयपूजेचा साहित्यभक्तांकडून होणारा मंगलोत्सव होय.'' संमेलन जाहीर झाले की परिसरातील लोकांची उत्सुकता वाढते. जथ्थेच्या जथ्थे संमेलनस्थळी येतात. दिवसभर कार्यक्रम करायचे असतील तर मोठा मांडव उभारावा लागतो. मग त्यातल्या खुर्च्या, दिवे, पंखे, इत्यादी येतात. प्रचंड मोठे व्यासपीठ उभारले जाते. ध्वनिव्यवस्था उत्तम- परिणामी

महाग – करावी लागते. संमेलनांमध्ये तात्कालिक तसेच चिरंतन महत्त्वाचे विषय असतात. प्रसिद्ध साहित्यिक येणार असतात. त्यामुळे भरपूर गर्दी होते.

केवळ शैक्षणिक/साहित्यिक/अभ्यासक स्वरूपाची संमेलने असावीत का? मग श्रोत्यांची संख्या पुष्कळच कमी होईल. गंभीर चर्चेतून काही निष्कर्ष हाती लागतील, पण असे संमेलन एका विशिष्ट स्तरापर्यंत मर्यादित राहील. तो लोकमहोत्सव होणार नाही. साहित्यिक विषयांवर एरवी साहित्य संस्थांतर्फे चर्चा/परिसंवाद होतच असतात.

संमेलनाचे कार्यक्रम ठरवताना एक वेगळीच कसरत करावी लागते. निमशहरी, ग्रामीण भागात संमेलन असले की स्थानिकांना प्रसिद्ध, टीव्हीवर दिसणारे वक्ते आणि कवी हवे असतात. तर महामंडळाला नवी प्रतिभा शोधायची असते. 'तेच ते चेहरे व्यासपीठावर दिसतात' अशी टीका होते. परंतु स्थानिक श्रोत्यांसाठी ते चेहरे प्रथमच प्रत्यक्ष दिसत असतात. खरे तर त्या चेहऱ्यांसाठीच ते संमेलनाला आलेले असतात. प्रसिद्ध कवींची लोकप्रिय कविता त्यांना त्या कवीकडून ऐकायची असते. टीव्हीवर दिसणाऱ्या वक्त्याला प्रत्यक्ष पाहायचे असते. प्रसिद्ध वक्ते, कवी, हे मुळात त्यांच्यामधील असाधारण गुणांमुळे प्रसिद्ध झालेले असतात. त्यांच्याबद्दल कुतूहल असणारच.

चर्चेचे/परिसंवादाचे विषय निवडताना जुन्या–नव्याचा तोल सांभाळावा लागतो. संमेलनाच्या परिसराचाही विचार करावा लागतो. चंद्रपूरच्या संमेलनात नक्षलवादावर परिसंवाद होता. तेव्हा श्रोत्यांमधील एक स्त्री अचानक व्यासपीठावर चढली व आपले अनुभव सांगू लागली. बहुतेक ठिकाणी एका तरी सत्रात संतसाहित्याचा विचार व्हावा असा आग्रह असतो. मराठी भाषेवर चर्चा हवी असते. ग्रामीण साहित्याचा खरे–खोटेपणा तपासायचा असतो. स्त्रियांचे लेखन–वाचन हाही विषय येतो. परंतु तरुणांचे वाचन, त्यांचे ब्लॉगलेखन, ऑडिओ बुक्सचा परिणाम, इत्यादी विषय अधिक प्रकर्षाने यायला हवेत.

संमेलनाला जोडून ग्रंथप्रदर्शनाचे प्रचंड मोठे दालन असते. साधारण तीनशे ते साडेतीनशे गाळे असतात. त्यांचे वाटप, त्यातल्या सोयी, दोन रांगांमधील आवश्यक अंतर, त्यामुळे वाढणारी जागेची गरज, इत्यादी बाबींकडे लक्ष पुरवावे लागतेच. सर्व प्रकारची प्रकाशने तेथे हजेरी लावतात. चंद्रपूरच्या संमेलनाच्या वेळी 'इथे ५० गाळे पुरतील' असा काहींचा सूर होता. प्रत्यक्षात ३५०च्या वर गाळे लागले. प्रचंड प्रतिसाद मिळाला. सर्वाधिक खप 'श्यामची आई' या पुस्तकाचा झाला. मराठी पुस्तकांची दुकाने मुंबई–पुण्यातही कमी झाली आहेत. ग्रामीण किंवा निमशहरी भागात मोठ्या प्रकाशनांची नावाजलेली पुस्तके मिळणे हे अप्रूपच असते. काही

वेळा तेथे लेखकांची भेटही होते. अशी पुस्तकांची जत्रा ही साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने आश्वासक घटना म्हटली पाहिजे. चरित्र–आत्मचरित्र या प्रकारांना भरपूर मागणी असते. माहितीपर पुस्तकेही विकली जातात. आध्यात्मिक आणि पाककलेविषयक पुस्तके लोकप्रिय असतातच. मात्र गाळेधारकांना पुरेशा सुविधा मिळाल्या पाहिजेत. पुस्तकप्रदर्शन मुख्य संमेलनाच्या जवळपासच असले पाहिजे. ऑडिओ बुक्ससाठी व्यवस्थेचाही विचार व्हावा.

गेली चार संमेलने– यवतमाळ, उस्मानाबाद, नाशिक व उदगीर – अध्यक्षपदाच्या निवडणुकीशिवाय झाली. महामंडळाने अनेकांची मते विचारात घेऊन अध्यक्षांची निवड केली. निवडणुकीच्या व्याप–तापातून उमेदवारांपासून महामंडळापर्यंत सर्वांचीच सुटका झाली. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर यांच्यासारखे अनेक मोठे साहित्यिक निवडणुकीच्या पद्धतीला विरोध असल्याने अध्यक्ष होऊ शकले नाहीत. निवडणुकीच्या निमित्ताने माध्यमांमध्ये अनावश्यक चर्चा घडतात. प्रत्यक्ष मतदानाची यंत्रणा ही फार किचकट असते. त्यात चुका होतात. मुख्य म्हणजे नव्या पद्धतीत साहित्यिकांचा मान राखला जातो.

संमेलन अधिक वाचकाभिमुख व्हावे, असे अनेकदा म्हटले जाते, ते योग्य आहे. एखादा परिसंवाद किंवा चर्चा वाचकांमधली असावी; त्यात वेगवेगळ्या परिसरातून (शहरी–निमशहरी–ग्रामीण), भागातून आलेले वाचक असावेत. वयोगटही भिन्न असू शकतील. हा प्रयोग निश्चित करून पाहण्यासारखा आहे.

संमेलनस्थळाच्या निवडीबद्दलही रसिकांच्या मनात अनेक शंका आहेत. मुळात संमेलनासाठी महामंडळाकडे आमंत्रणे यावी लागतात. ती शक्यतो साहित्यिक/शैक्षणिक/ग्रंथालये अशा संस्थांकडून असावी लागतात. महामंडळाच्या घटकसंस्थांपैकी कुणी आमंत्रण दिले, तर त्याला प्राधान्य द्यावे लागणार हे उघड आहे. संमेलनासाठी जागा, साहित्यिक व प्रतिनिधींची निवास–भोजन व्यवस्था, संमेलनस्थळी जाण्या–येण्यासाठी वाहनव्यवस्था, एवढा मोठा जमाव एकत्र येणार असल्यामुळे सुरक्षाव्यवस्था, पुस्तकप्रदर्शनासाठी संमेलनाजवळ भरपूर जागा, इत्यादी अनेकानेक व्यवधाने सांभाळावी लागतात. आमंत्रक संस्थेकडे भरपूर मनुष्यबळ आवश्यक असते. शिवाय त्या स्थळी पूर्वी संमेलन झाले होते का? केव्हा झाले होते? हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते.

हा व्याप आणि विस्तार समजला म्हणजे हेही समजेल की संमेलन उभारण्यासाठी खूप मोठी यंत्रणा लागते. इथेच राजकीय पाठिंबा किंवा हस्तक्षेप हा प्रश्न उभा राहतो. कलेला पूर्वीपासूनच राजाश्रयाची गरज लागत आलेली आहे. त्यामुळे शासनाने मदत देण अपेक्षित आहे. ती लागू नये म्हणून केलेला संमेलननिधीचा प्रयोग यशस्वी झाला नाही. परंतु संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारण्यांचा वावर बहुतेकांना आक्षेपार्ह

वाटतो. एरवी संमेलनाच्या आखणीत, चर्चेचे विषय ठरवण्यात, सहभागी वक्ते–कवी यांच्या निवडीत, क्वचित अपवाद वगळता, नेत्यांचा काही हस्तक्षेप नसतो. अनेकदा शासनविरोधात भाषणे होतात.

तरीही, नेते पाहुणे म्हणून आले की सुरक्षाव्यवस्था कडक होते. दाराशी उभे असलेल्या पोलिसाला साहित्यिकांची ओळख नसते, आणि साहित्यिक अनेकदा ओळखपत्रे दाखवण्यास नाराज असतात. त्यामुळे मोठा पेच उभा राहतो. संमेलनाकडे यायला निघालेल्या नेत्यांना रस्त्यात त्यांचे मतदार अडवतात, त्यांचा सत्कार करतात – त्यामुळे संमेलनाचे वेळापत्रक कोलमडते आणि कधी कधी तर संमेलनाचे केंद्रबिंदू असलेल्या अध्यक्षीय भाषणाला पुरेसा वेळ मिळत नाही. गेल्या वेळी महामंडळ मुंबईकडे असताना अध्यक्षीय भाषण आम्ही उद्घाटन समारंभाच्या मध्यावर आणले होते. कार्यक्रमातील सुरुवातीची भाषणे आटोपशीर असावीत, अशीसुद्धा अपेक्षा आहे.

वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका हाही एक महत्त्वाचा विषय आहे. संमेलनातील कुठल्या घटनांना किती महत्त्व द्यायचे, याचे स्वातंत्र्य त्यांना आहेच. परंतु काही वेळा क्षुल्लक गोष्टींना महत्त्व देऊन टीका केली जाते. काही वेळा घाईने बातमी दिली जाते. एका संमेलनात कार्यक्रम सुरू असताना पाऊस पडला. दिवे गेले. उपस्थित पोलीस श्रोत्यांच्या मध्ये एका रांगेत उभे राहिले. काही वेळाने दिवे आले, कार्यक्रम पूर्ण झाला. तोवर इकडे 'पावसाने कार्यक्रमाचा फज्जा उडाला' अशा बातम्या प्रसृतही झाल्या होत्या. चंद्रपूरच्या संमेलनात 'महामंडळाला तुकडोजी महाराजांचा विसर' अशी बातमी आली. संमेलनस्थळाच्या मुख्य द्वाराला त्यांचे नाव दिलेले कुणी पाहिलेच नव्हते.

संमेलनाच्या समारोपप्रसंगी काही ठराव मांडण्यात येतात. या ठरावाचे पुढे काय होते, असा प्रश्न विचारला जातो. हे ठराव म्हणजे तेथे जमलेल्या जनसमूहाचे मत असते. महामंडळाकरवी ते शासनापर्यंत पोचवण्यात येते. त्यांचा पाठपुरावा करण्याइतकी शक्ती त्या संस्थेकडे नाही. ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे पगार वाढवण्यात यावेत असा ठराव घेऊन मी मंत्रालयात मुख्य सचिवांना भेटून आले होते. ती फाइल संबंधित खात्याकडे पाठवतो असे त्यांनी म्हटले. पुन्हा पुन्हा तेच ते ठराव होतात, कारण जनमताचा रेटा शासनापर्यंत पोचावा, ही अपेक्षा असते.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा 'दीड दिवसाचा गणपती' असतो असे शेरेही आपण ऐकले आहेत. संमेलनाचे अध्यक्षपद हे त्या साहित्यिकाच्या आजवरच्या कामाचा गौरव असतो. त्याने पुढे वर्षभर ठिकठिकाणी भेटी द्याव्यात असे रसिकांना वाटणे स्वाभाविक आहे. ज्या अध्यक्षांना तसे जाणे

शक्य आहे. ते आवर्जून तसा प्रयत्न करतात. परंतु तो त्यांचा पर्याय आहे, आवश्यकताा नव्हे.

काही वर्षांपूर्वी महामंडळाने विश्व मराठी साहित्य संमेलनाचा उपक्रम करून पाहिला. प्रचंड संख्येने मराठी लोकांची तरुण पिढी परदेशात स्थायिक झालेली आहे. बुद्धी आणि परिश्रमाच्या जोरावर परक्या भूमीत आपले स्थान निर्माण केलेल्या ह्या मराठी तरुणांना मराठी भाषेचे जतन करण्याची इच्छा आहे. आपल्या मुलांनी त्यांची मराठी मुळे विसरू नयेत असे त्यांना वाटते. त्यामुळे काही ठिकाणी मराठीचे वर्गही चालवले जातात. सोमवार ते शुक्रवार स्वत:चे व्यवसाय व घरकाम सांभाळून शनिवार-रविवारी उत्साहाने व स्वखर्चाने ते या मराठीच्या संस्था चालवतात. त्यांना येथील साहित्यिकांना प्रत्यक्ष भेटायची, ऐकायची उत्सुकता असते. काही चर्चा घडवून आणायच्या असतात. म्हणून प्रथम अमेरिकेतील बे एरियात पहिले विश्व मराठी संमेलन आयोजित केले होते. गंगाधर पानतावणे अध्यक्ष होते. विमानतळावरील स्वागतापासून ते परतीचा निरोप देण्यापर्यंतचे सर्व कार्यक्रम आयोजकांनी स्वत: राबून केले. खर्चाची तजवीजही श्रोत्यांसह सर्वांनी केली. महाराष्ट्र शासनानेही काही मदत दिली. प्रादेशिक किंवा इतर कुठलाही विचार न करता सॅन होजेला उत्तम वक्ते, कवी, न्यायचा आम्ही प्रयत्न केला. तेथील लोकांनी संमेलन मनासारखे झाल्याची पावती दिली. दुसरे विश्व मराठी संमेलन दुबईला तर तिसरे सिंगापूरला झाले. संमेलने आटोपशीर तरीही उत्तम झाली. परंतु टोरांटोच्या निमंत्रक संस्थेने आग्रह धरला की महामंडळाच्या सर्व सदस्यांना संमेलनाला न नेता, त्यातील निवडक व्यक्तींना न्यावे व त्यांच्या जागी इतर साहित्यिकांना घ्यावे. महामंडळाला तसे करणे शक्य नव्हते. शासनाने हात आखडता घेतला. माध्यमांनी टीकेची झोड उठवली. त्यामुळे ते संमेलन बारगळले. नंतरही अनेक कारणांनी - कोरोनासह - ते शक्य झाले नाही. असे वाटते की सर्व सहभागी व्यक्तींनी थोडा आर्थिक हातभार लावला व शासनानेही मदत केली तर पुन्हा विश्व मराठी संमेलन घेता येईल. आपली पुढची पिढी, त्यांची पुढची पिढी, मराठीपासून तुटून जाऊ नये, अतिशय समृद्ध अशा मराठी साहित्यापासून वंचित राहू नये, ही या विचारामागची भावना आहे.

महामंडळाच्या घटक आणि समाविष्ट/संलग्न संस्था वर्षभर विविध साहित्यिक कार्यक्रम करत असतात. लहान-मोठी संमेलने भरवत असतात. वाङ्मयीन नियतकालिके चालवतात. विविध कार्यशाळा आयोजित करतात. साहित्यिक पुरस्कार प्रदान करतात. यातील प्रत्येक कार्यासाठी अनेकांना कष्ट घ्यावे लागतात, स्वत:चा वेळ द्यावा लागतो, प्रसंगी खर्चही करावा लागतो. भाषेबाबत उदासीन होत चाललेल्या समाजामध्ये असे कार्य नेटाने वर्षानुवर्षे करत राहणे सोपे नाही. त्या संस्थांच्या माध्यमातून


महामंडळाचेच काम सुरू असते.

परंतु या कामात तरुणांचा सहभाग वाढायला हवा. शिक्षणाच्या माध्यमापासूनच प्रत्येकाच्या साहित्यिक आवडीनिवडी तयार होतात. व्यावहारिक दृष्टिकोनातून इंग्रजी माध्यमाची पालक निवड करत असले, तरी आता मराठी विषय अनिवार्य करण्यात आला आहे. त्या संधीचा फायदा घेऊन, शालेय-महाविद्यालयीन स्तरावर साहित्य संमेलने आयोजित करता येतील. मुंबई मराठी साहित्य संघाने अशी अनेक विद्यार्थि-संमेलने भरवली आहेत. त्यातील आश्वासक वक्ते-कवी यांना अखिल भारतीय संमेलनात संधी देता येईल. मुख्य संमेलनाला जोडून तरुणांचे उपसंमेलन घेता येईल. ठाणे येथे असा प्रयोग यशस्वी झाला होता. ग्रामीण-निमशहरी भागांमध्ये संमेलनाला चांगला प्रतिसाद मिळतो. शहरांमधील तरुणवर्गाच्या जिव्हाळ्याचे विषय घेऊन तसाच उत्साह तिथेही जागवता येईल.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाला ६१ वर्षांची परंपरा आहे. तिला नवतेची जोड देऊन अधिक समृद्ध आणि सशक्त करता येईल.

**– प्रा. उषा तांबे**
भ्रमणध्वनी : ९८२०३२५४७३

## श्री. सुधीर ठाकूर यांचे अभिनंदन



संगीत नाटकांपासून आताच्या प्रायोगिक नाटकांपर्यंत गेली शंभरहून अधिक वर्षे मराठीजनांनी नाट्यकलेवर भरभरून प्रेम केले. मराठी नाट्यसृष्टीत तब्बल ६८ वर्षे कार्यरत असणारे कळवा येथील ज्येष्ठ नेपथ्य, पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजनाकार सुधीर ठाकूर यांना यंदाचा अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबई मराठी साहित्य संघात नाट्यशाखेचे सहकार्यवाह म्हणून ते अजूनही कार्यरत आहेत.



ज्येष्ठ कवयित्री रजनी परुळेकर
एका शाश्वत 'कविते'ला विनम्र अभिवादन

# आकाशभर एकाकीपणाची नितांत सावली

## डॉ. महेश केळुसकर

नक्की साल आठवत नाही. ९४-९५ च्या दरम्यान कधीतरी आकाशवाणीत माझ्या टेबलावरचा लॅन्डलाइन वाजला. पलीकडून-

''हॅलो महेश, मी रजनी परुळेकर बोलतेय. आमच्या बुऱ्हाणी कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळानं येत्या शनिवारी दुपारी काव्यवाचन ठेवलंय. तुला यायचंय. कविता वाचायच्यात. निदा फाजली, बागवे आणि तू-''

''अहोपण रजनीताई-''

''पण-बिण काही नाही. यायचंय तुला.''

आणि त्यांनी फोन ठेवला. गेलो. आम्ही तिघांनी दोन तास कविता वाचल्या. दोन गझला किंवा नज़्म वाचून झाल्यावर निदासाहेब पान खायचे स्टेजवरच. मी जरा विस्फारलेल्या डोळ्यांनी ते पान लावताना बघत असताना म्हणाले, ''देखो महेश, हम शायर लोग है - शायरोंने हमेशा ट्रान्सपरन्ट रहना चाहिये- हर आदमीमें होते हैं दस-बीस आदमी/जिसको भी देखना हो कई बार देखना।

मैफल मस्त झाली. मुलांचा आणि प्राध्यापकांचा प्रतिसाद हुरूप वाढवणारा होता. कार्यक्रमानंतर स्टाफरूममध्ये नेऊन रजनीताईंनी आम्हाला खाऊपिऊ घातलं. हातात पाकिटं दिली. मला म्हणाल्या, ''पाकीट घरी जाऊन उघड. दिलेत तेवढेच घ्यायचे. तक्रार नाय चालणार.'' त्या हसल्या. आम्हीही हसलो. त्यांच्या आवडत्या कवींवर हक्क गाजवण्याची त्यांची ती पद्धत होती. त्या आधी माझी-त्यांची प्रत्यक्ष ओळख नव्हती. कधी फोनवरही बोलणं झालं नव्हतं. पण मग, एवढा हा जिव्हाळा आला कुठून! रजनीताई, मला अरे-तुरेतच बोलायच्या. मी त्यांना रजनीताई म्हणत आलो. त्यांच्या कवितेबद्दलच नाही, तर एकूणच त्यांच्या मनस्वी वागण्या-बोलण्याबद्दल मला आदर वाटायचा. भीतीही.

भीती कसली? तर हा मनस्वीपणाच त्यांचा घात करणार, जसा गुरुनाथ धुरी आणि काही कवींचा झाला तसाच, असं मला सारखं वाटायचं. हट्टी होत्या रजनीताई.

टोकाच्या हट्टी. त्यांना त्या त्यावेळी जे वाटलं, ते त्यांनी लिहिलं. बोलणंही तसंच. पारदर्शक. 'हम शंभर लोग है'ची आठवण करून देणारं. रेडिओवर काव्यवाचनासाठी मी त्यांना तीन-चार वेळा बोलावण्याचा प्रयत्न केला. एकदाही आल्या नाहीत. ''अरे मला रेडिओवर नाही वाचायच्यात कविता. तुझ्या घरी घेऊन वाचायच्यात तर सांग-'' एकदम थेट. खटाखट. 'मौजे'च्या गिरगावच्या कचेरीत माझ्या 'निद्रानाश' कवितासंग्रहाचं काम चाललं होतं २०१६ साली. खूप फेऱ्या व्हायच्या. एकदा तसा काही विषय नसताना अचानक गुरुनाथ सामंत म्हणाले, ''रजनीचं काही खरं नाही. दुपारी-तिपारी एकटीच वणवणत असते गिरगावच्या गल्ल्यांमधून. कुठल्याही दुकानासमोर उभी राहते आणि हे द्या, ते द्या म्हणून ओरडते.'' मी म्हटलं, ''त्यांना उपचारांची गरज असणार. जाऊन बघून येतो.'' तर सामंतांनी अडवलं. त्याच्या मागच्याच आठवड्यात दुपारी सामंत घरी जात असताना त्या एका बंद दुकानाच्या पायरीवर बसलेल्या दिसल्या होत्या. यांनी त्यांना घरी चलण्याचा आग्रह धरला तर धुडकावूनच लावलं एकदम. शकुंतला मुळ्येबाई मात्र अधूनमधून फळंबिळं आणि बायकांना आवश्यक लागणाऱ्या वस्तूंची पिशवी त्यांच्या शेजारी ठेवून यायच्या. रजनीताई गेल्याची बातमी ऐकली तेव्हा हे सगळं आठवलं. त्यांच्या अव्यक्त कविताही एकामागोमाग एक आठवायला लागल्या...

माझे खिळलेले पाय
तहानलेल्या मुळांप्रमाणे
जमिनीत रुतत चाललेयत

आणि 'तू रागावली आहेस' या कवितेतल्या ओळी, चटका लावणाऱ्या-

आणि देह गीतमय व्हावा
म्हणून वाऱ्याची वाट पाहणारे
वेळूचे बेट बनलेले शरीर
त्या वेळचे तुझे नि:श्वास
दबलेला हुंदका मला ऐकू येतो

आता हे मैत्रिणीशी बोलणं म्हणायचं की स्वत:च्याच कवितेशी? रजनी परुळेकरांच्या बहुतेक कवितांमधली ही काव्यात्म संदिग्धता त्यांच्या कवितेची परिमिती वाढवते. आशयाची अनेकार्थता असणं, हे सशक्त कवितेचं नेहमीच एक लक्षण राहात आलेलं आहे. व्यामिश्र मनोव्यापरांचे परुळेकरांचे व्यक्तिगत अनुभव त्यांच्या अनेक दीर्घ कवितांमधून अनेकार्थ प्रकट करतात, समाजमनावर, गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेवर काव्यात्म भाष्य करतात.

रजनी परुळेकर सत्तरीच्या दशकात कविता लिहू लागल्या. हा काळ राजकीय

व सामाजिक घटनांनी अस्वस्थ होता. कवयित्रीही अस्वस्थ होती. त्यांनी थेट राजकीय किंवा सामाजिक आशयाची कविता लिहिली नाही. त्यांची कविता व्यक्तिनिष्ठ हेती. पण, एक व्यक्ती म्हणून आलेले त्यांचे अनुभव कवितारूपांतून प्रकट होऊ लागले तेव्हा स्त्री-पुरुष संबंधांचं राजकारण, नात्यागोत्यांमधील विसंवाद, परात्मता आविष्कृत होताना समाजशोध घेऊ लागले. 'आकाशभर एकाकीपणाची निवांत सावली' सार्वत्रिक झाली.

ताज्या दम्याच्या दहा निवडक कवींचा 'कविता दशकाची' हा संग्रह 'ग्रंथाली'नं १९८० साली प्रकाशित केला. त्यात ९ पुरुष कवी आणि दहाव्या एकमेव रजनी परुळेकर. पदार्पणातच आपण स्वयंभू कवी आहोत, हे रजनीताईंनी दाखवून दिलं. मग 'दीर्घ कविता' (१९८५), 'काही दीर्घ कविता' (१९९३), 'स्वीकार' (१९९३), 'चित्र' (१९९६) आणि 'पुन्हा दीर्घ कविता' (१९९९) हे त्यांचे कवितासंग्रह एकामागोमाग एक येत गेले. १९९९ नंतरही त्या कविता लिहीत होत्या. परंतु पुढे कविता लिहिण्याचं त्यांनी कधी थांबवलं, माहीत नाही. ज्या दिवशी त्यांचं कविता लिहिणं थांबलं त्या दिवसापासून त्यांचा लौकिक शोकांतिकेच्या दिशेनं प्रवास सुरू झाला असावा. कविता हेच तर त्यांच्या जगण्याचं एकमेव कारण होतं. भूतकाळ-वर्तमानकाळ आणि काल्पनिक स्वप्नसृष्टीतून सतत येरझाऱ्या घालणारी ही कवयित्री शेवटी थकली असावी. आपल्या व्यामिश्र मनोव्यापारांचा आत्मशोध घेता-घेता एकटेपणाच्या कोषात अधिकाधिक गुंतत गेली असावी. बिनतोड घनदाट अंधारातील हे अनमोल एकाकीपण व्यक्त करताना 'हे प्रियतम भ्रमनिरास' या कवितेत रजनी परुळेकर लिहितात-

आकाशभर एकाकीपणाची निवांत सावली
पावलागणीक तीच हिरवळ होऊन
थकलेले तळवे कुरवाळणारी
यापुढे माझे शरीर कोसळेपर्यंत
या अंधाराच्या सोबतीला तरी
मृत्यूचा शाप नाही

ही अंधाराची सोबतही अखेर ५ मे २०२२ रोजी संपली. रजनीताई अज्ञात महाअंधारात विरून गेल्या...

सृजनशीलतेचा ध्यास असलेली अतिरेकी संवेदनशीलता अखंड अस्वस्थ असते. आपल्यामध्ये एक 'राक्षसी मूल' दडलेलं आहे, असं त्या म्हणायच्या. स्वत:च्या व्यामिश्र मनोव्यापारांचा पाठलाग करताना, स्त्री-पुरुषसंबंधांची तपासणी करताना, एकटेपणाच्या डोळ्याला डोळा भिडवताना आपल्या कवितांमधून अनेक कबुलीजबाब


त्यांनी दिलेले आहेत. रजनी परुळेकर यांनी केलेले हे 'कवितेतील सत्याचे प्रयोग' विलक्षण अंत:शक्तीचं दर्शन घडवतात.

देवकेळीसारखी विद्यार्थिनी, डोळ्यांतले हिरवे काजळ, किलोभर सुरणासारखं कुबड, सुकलेल्या पालेभाजीसारखी अवघ्या शरीराची जुडी अशी स्त्री-भावजीवनाशी निगडित असलेली प्रतीकं आणि प्रतिमा अगदी सहजपणे त्यांच्या कवितांमधून पदोपदी भेटतात. पौराणिक, धार्मिक आणि परिकथांमधले संदर्भ येतात. जुन्या मराठी-हिंदी गाण्यांमधले तुकडे मध्येच चमकून जातात. पण, हे सगळं नैसर्गिक ऊर्मीतून येईल तेवढंच. आपलं भावविश्व छंदोबद्ध कवितेला अनुकूल नाही, हे त्यांनी ओळखलं होतं. म्हणून त्यांनी बव्हंशी अनुभवांच्या आविष्कारासाठी दीर्घ कवितेचा रूपबंध वापरला. 'एकट्या आर्त संध्याकाळी', 'अखेरचे पत्र' यांसारख्या त्यांच्या कवितांमधून मुक्तछंदाची ताकद दिसून येते.

सीता-सावित्रीच्या त्यागाचे
उदात्तीकरण करणारी पाने जाळून
प्रथम शुचिर्भूत करायला हवे हे न्यायालय ('मिलॉर्ड')

असं जरी त्या म्हणत असल्या तरी त्यांचा स्त्रीवाद मानवतावादाकडे नव्हता. त्या पुरुषांच्या विरुद्ध नव्हत्या. पुरुषी वर्चस्वाविरुद्ध होत्या. हे कवित्व आक्रमकतेबरोबरच आर्जवी आणि आर्द्र होतं. पारदर्शक होतं. स्वप्न-वास्तवाच्या, भास-आभासांच्या सीमारेषेवरचं द्वंद्व खेळताना रजनी परुळेकर लौकिकात व्यक्ती म्हणून हरल्या, पण कवी म्हणून अखेरपर्यंत शाबूत राहिल्या. मराठी कवितेच्या इतिहासात त्या नेहमीच दखलपात्र राहतील. आपल्या कवितांमधून जिवंत असतील.

**– डॉ. महेश केळुसकर**
भ्रमणध्वनी : ७०६६२७४२०३



# ज्ञानेश्वरी.. निर्मितीप्रक्रिया

## प्रा. अशोक बागवे

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात या पृथ्वीतलावर अवकाशातील एक निराकार अमृतध्वनी इंद्रायणीच्या तटी आळंदीला– सिद्धोपंत कुळकर्णी या भाविक सज्जनाची एकुलती लेक– रुक्मिणीच्या उदरी साकार झाला. या अमृतध्वनीचे नाव ''ज्ञानदेव'' होय..!

गोदातटी असलेल्या पैठणजवळील आपेगावचे विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या कैवल्य पदरात चार जीव खेळू लागले. या चार सद्‌पिल्लांची नावे– (निवृत्ती, जन्मशक ११९४.. इसवीसन..१२७२) (ज्ञानदेव, जन्मशक ११९७..इसवीसन..१२७५) (सोपानदेव, जन्मशक १२००..इसवीसन..१२७८) (मुक्ताबाई, जन्मशक १२०३.. इसवीसन..१२८१)

या भावंडांची नावे देखील मानवी जीवनाची तत्त्वप्रणाली सांगणारी आहेत. 'निवृत्ती' अंगी बाणल्याशिवाय 'ज्ञान' प्राप्त होत नाही आणि जर 'मुक्ती' मिळवायची असेल तर 'सोपान' म्हणजे योगसाधनेच्या पायऱ्या चढून परमतत्त्वी जावे लागते..! म्हणून रुक्मिणी–विठ्ठल यांची अपत्ये असलेल्या निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान मुक्ताबाई ही नावेसुद्धा एक अध्यात्मिक तत्त्व बिंबवणारी आहेत..!

महाराष्ट्राच्या या पावन भूमीवर अवतरलेला ''ज्ञानदेव'' नावाचा हा चिद्विलास म्हणजे एक अभूतपूर्व सात्विक चमत्कार होय..! शके ११९७ म्हणजे इसवीसन १२७५.. श्रावण वद्य अष्टमीला गुरुवार मध्यरात्री ज्ञानदेवांचा जन्म..! नि शके १२१८ म्हणजे इसवीसन १२९६.. कार्तिकी वद्य त्रयोदशी मध्यान्ही अलंकापुरी इंद्रायणीतिरी श्रीसद्गुरू मंदिरी शिवसान्निध्यात ज्ञानदेवांनी सदेह संजीवन समाधी घेतली..! सद्गुरू निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना समाधी विवरात नेले व आसनावर बसविले..!

सूर्यतेज विलीन झाल्यानंतर मध्यरात्रीच्या अंधःकारात ज्ञानसूर्याचा जन्म झाला आणि जेव्हा टळटळीत मध्यान्ही सूर्य आकाशात तळपत असताना या ज्ञानसूर्याचा अस्त झाला..! संत नामदेव महाराजांनी समाधी सोहळ्याचे वर्णन अतिशय आर्त अभंगात केले आहे..ते असे––

■ ■ ■ ■

देव निवृत्ती यांनी
धरियेले दोन्ही कर
जाती ज्ञानेश्वर
बैसावया..

नदीचिया माशा
घातले माजवण
तैसे जनमन
कालवले..

दाही दिशा धुंद
उदयास्ताविण
तैसेचि गगन
कालविले..

जाऊनी ज्ञानेश्वर
बैसले आसनावरी
पुढे ज्ञानेश्वरी
ठेवियली..

ज्ञानदेव म्हणे
सुखी केले देवा
पादपद्मी ठेवा
निरंतर..

तीन वेळा जोडिले
करकमळे
झाकियले डोळे
ज्ञानदेवे..

भीममुद्रा डोळा
निरंजन मैदान

झाले ब्रह्मपूर्ण
ज्ञानदेव..

नामा म्हणे आता
लोपला दिनकर
बाप ज्ञानेश्वर
समाधीस्थ..

■ ■ ■ ■

भीममुद्रा म्हणजे शांभवी मुद्रा..! खेचरी मुद्रेपुढील ही अवस्था..! शांभवी मुद्रेत रंध्रे बंद होतात. फक्त ब्रह्मरंध्र राहते. 'डोळा निरंजन मैदान' म्हणजे दृष्टी ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी स्थिर व प्रकाशमान झालेली आहे. त्यामुळे स्थळकाळाचे व देहाचे भान नसते; म्हणून अमरता..! ''ककारां''तीचे अमृतपान अखंड चालू असते, असे ज्ञानेश्वर, ''संजीवन समाधी''मध्ये आहेत..!

वय वर्षे सोळा ते एकवीस या उण्यापुऱ्या पाच वर्षांच्या कालावधीत विश्वाला पालाण घालणारी ग्रंथसंपदा निर्माण करण्याची प्रेरणा या बालयोग्याच्या मानसविश्वात कशी तरळली असावी..? ''भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ आणि अभंगरचना'' या पंचसूक्त निर्मितीचे रहस्य काय असावे..? गीतेवरील भाष्यकाव्य लिहिण्याची स्फूर्तीदायी प्रेरणा कोणाकडून मिळाली असावी..? याविषयीची काही सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कारणे आपण तपासू शकतो. आताच्या नगर जिल्ह्यातील प्रवराकाठी असलेल्या 'नेवासे' या गावातील मंदिरात पैसाच्या खांबाला टेकून ज्ञानदेवांनी त्यावेळच्या सामान्य जनांना गीतेवरील अमृतभाष्य तत्कालीन प्राकृत-मराठीमध्ये उत्स्फूर्तपणे सांगितले.

''शके बाराशे बारोत्तरे/ तै टीका केली ज्ञानेश्वरे/
सच्चिदानंदबाबा आदरे / लेखकु जाला //''

शके १२१२ म्हणजे इसवीसन १२९० साली ज्ञानदेवांनी उत्स्फूर्तपणे गीताभाष्य निरूपण केले नि त्यांचे परमशिष्य सच्चिदानंद यांनी ते टिपून घेतले. ''भावार्थदीपिका'' सांगण्यामागील उद्देश खुद्द ज्ञानदेवांनी काही ओव्यांमध्ये मांडला आहे--

अध्याय पहिला..ओवी क्र. ७० ते ८०
======================
गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी ।
जेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारोनी ।। ७०।।

भगवान श्रीकृष्णांनी गलितगात्र झालेल्या अर्जुनाला भगवद्गीता सांगितली. त्या गीतार्थाची थोरवी स्वतः शंभूमहादेव विवरण करतात, असे जेव्हा भवानीने म्हणजे उमेने पाहिले; तेव्हा तिने कुतूहलाने सहज भगवान महादेवाला प्रश्न केला, की श्रीविष्णूंनी सांगितलेली भगवद्गीतेची थोरवी तुम्ही का सांगता..?

तेथ हरू म्हणे नेणिजे । देवी जैसें का स्वरूप तुझें ।
तैसें नित्यनूतन देखिजे । गीतातत्व ।। ७१।।

यावर हरू म्हणजे भगवान शंकर म्हणतात की हा गीतार्थ म्हणजे हे देवी, तुझेच जसे प्रतिरूप आहे. पृथ्वीतलावर तू जशी वेगवेगळ्या रूपात दर्शन देतेस, तसेच प्रत्येक वेळी हा गीतार्थ मला नित्यनूतन रूपात कळतो.

हा वेदार्थसागरू । जया निद्रिताचा घोरू ।
तो स्वयें सर्वेश्वरू । प्रत्यक्ष अनुवादला ।। ७२।।

हा गीतार्थ म्हणजे साक्षात वेदांचा सागर आहे. भगवान श्रीविष्णू शेषशय्येवर योगनिद्रेत घोरत असताना त्या घोरण्यामधून निघालेला अनुवाद म्हणजे गीतार्थ होय..!

ऐसें जें अगाध । जेथ वेडावती वेद ।
तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ।। ७३।।

ज्ञानदेव म्हणतात, हा गीतार्थ इतका अगाध आहे की याचे वर्णन करताना वेदांचीही मती कुंठित होते. त्यापुढे मी तर अति अल्प मतिमंद असा साधक आहे.

हें अपार कैसेनि कवळावे । महातेज कवणें धवळावे ।
गगन मुठीं सुवावे । मशके केवीं ।। ७४।।

अपरिमित असा हा गीतार्थ मी कसा शब्दात कवळून घ्यावा..? जे महातेज म्हणजे सूर्य आहे त्याला आणखी कशाने शुभ्रसतेज करावे..? माशीच्या मुठीमध्ये गगन कसे काय मावेल..?

परी एथ असे एक आधारु । तेणेचि बोलें मी सधरु ।
जे सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ।। ७५।।

पण मला येथे एक आधार मिळालेला आहे आणि त्यानेच मी गीतार्थ सांगण्यास प्रवृत्त झालो आहे. तो माझा आधार म्हणजे माझे मला अनुकूल असलेले गुरुजी निवृत्तीनाथ होत..!

येऱ्हवीं तरी मी मुर्खू । जरी जाहला अविवेकु ।
तरी संतकृपादीपु । सोज्वळु असे ।। ७६।।

त्यांच्याशिवाय मी म्हणजे मूर्ख आहे. मी जरी अविवेक केला तरी माझ्या अविवेकाचे विवेकात रूपांतर करण्यासाठी माझ्यापाशी संतकृपेचा सोज्वळ दीपक म्हणजे निवृत्तीनाथ आहेत.

लोहाचे कनक होये । हे सामर्थ्य परिसींच आहे ।
की मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धी ।। ७७ ।।

लोखंडाचे सोने होते, हे सामर्थ्य फक्त परिसात असते किंवा अमृताने मृत व्यक्ती सुद्धा जीवित होते. तसेच माझे गुरुजी माझ्यासाठी परीस आहेत आणि ते अमृतसिद्धी आहेत.

जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुकया आथी भारती ।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ति । नवल कायी ।। ७८।।

प्रत्यक्ष सरस्वती प्रकटली तर मुक्याला सुद्धा वाचा फुटेल. ही सिद्ध वस्तूची सामर्थ्यशक्ती आहे. यात नवल असे काहीच नाही. ही वस्तूसामर्थ्यशक्ती म्हणजे माझे गुरू निवृत्तिनाथ आहेत.

जयातें कामधेनू माये । तयासी अप्राप्य काही आहे ।
म्हणऊनि मी प्रवर्तों लाहे । ग्रंथी इये ।। ७९।।

ज्याला कामधेनुरूपी माता गवसलेली आहे, त्याला जगात अप्राप्य असे काहीच नाहीय. म्हणून या गीतार्थाचा अनुवाद करण्यासाठी मी प्रवृत्त झालो आहे; कारण माझी साक्षात कामधेनू माता म्हणजे निवृत्तीनाथ आहेत.

तरी न्यून ते पुरतें । अधिक ते सरते ।
करून घ्यावे हें तुमते । विनवीतु असे ।। ८०।।

म्हणून श्रोत्यांना अशी नम्र विनंती आहे की काही उणे राहिले असेल तर पूर्ण करून घ्या आणि काही भाराभर मी बोललो असेन तर ते वजा करून घ्या, अशी विनंती मी श्रोत्यांच्या चरणी करतो आहे.

अशाप्रकारे भगवद्गीतेवर भाष्य करण्याचे सर्व श्रेय ज्ञानदेवांनी आपले वडीलबंधू निवृत्तीनाथ यांना दिले आहे. मुळामध्ये निवृत्तीनाथ हे नाथ संप्रदायी होत. नाथ संप्रदायाचा मूलमंत्र ''निर्वचना'' आहे. म्हणजे काही न बोलणे. साक्षात्कारावर त्यांचा भर आहे. अनुभूती महत्त्वाची. अनुभूतीमध्ये तर्क किंवा कार्यकारणभाव महत्त्वाचा नाही. आपल्याला आलेली संन्यस्त अनुभूती चारचौघात बोलून न दाखवणे, हे नाथसंप्रदायी महंतांचे ब्रीद असताना निवृत्तीनाथांनी आपल्या धाकट्या बंधूंना गीतेवर भाष्य करण्यास आवर्जून सांगितले, यामध्ये काही गर्भित सांस्कृतिक सद्‌हेतू होता.

''व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्'' अशा महाभारतातील कृष्णलीला व रुक्मिणीस्वयंवर यांची त्याकाळात सज्जड भाषांतरे होत असताना शिवाय महानुभावपंथीय कवी नरेंद्राचे ''रुक्मिणीस्वयंवर'' हे आख्यान अतिप्रसिद्ध असताना निवृत्तीनाथांनी श्रीकृष्ण भगवंतांनी गलितगात्र झालेल्या अर्जुनाला ''उत्तिष्ठ हे परंतपः'' असे जीवनसत्त्व देणारी जी गीता सांगितली, ती जनतेच्या भाषेत म्हणजे तत्कालीन प्राकृत भाषेत विशद करावी, अशी

आज्ञावजा सूचना निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांना का दिली असावी..?

असे म्हटले जाते की महाभारत एक कामधेनू आहे (गाय आहे) तिच्या आचळातले दूध म्हणजे गीता आहे आणि त्या आचळाचे दोधन करणारे (दूध काढणारा) परमात्मा भगवान श्रीकृष्ण आहेत आणि ज्या वासराला ते दूध पाजायचं आहे किंवा ते दूध प्राशनासाठी जे आतुर झालेले वासरू म्हणजे अर्जुन आहे..!

गीता हे जीवनरहस्य आहे. कर्मयोगाची महती सांगून जीवन अधिक सुसह्य, सुसंस्कृत व सौंदर्यपूर्ण करण्याची ती एक जिवीतसारिणी आहे. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात प्रथमच परकीय आक्रमण झाले. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात अल्लाउद्दीन खिलजीचे पहिले आक्रमण महाराष्ट्रावर झाले. गटागटात, संस्थानात नि सामंतशाहीच्या जंजाळामध्ये विभागलेल्या महाराष्ट्रीय रयतेला एकत्र, एकत्वाने, एकतत्त्वप्रणालीने जीवनसन्मुख करायचे असेल, तर भगवद्गीतेचे जीवनरहस्य अंगिकारणे आवश्यक होते, हे जाणण्याची दूरदृष्टी निवृत्तीनाथांकडे होती. निवृत्तीनाथांना अर्जुनाच्या ठिकाणी तत्कालीन हतबल अवस्थेतील महाराष्ट्र दिसत होता..!

तत्कालीन महाराष्ट्राच्या या विषादयोगाला जीवनसन्मुख करणारे प्रेरक 'उत्तिष्ठ'तत्त्व (भगवद्गीतेचे भाष्यकाव्य) आपल्या परम शिष्याला मराठी रयतेसाठी जनमानसाच्या भाषेत सांगण्याची आज्ञावजा विनवणी निवृत्तीनाथांनी केली.

अशा या जीवनदायी ''भावार्थदीपिके''चे पहिले संपादन एकनाथ महाराजांनी पंधराव्या शतकात केले. आणि भावार्थदीपिकेचे ''ज्ञानेश्वरी'' असे नामाभिधान केले. संपादन केल्यानंतर त्यांनी एक साडेचार चरणी ओवी लिहिली, ती अशी--

इये ज्ञानदेवीपाठी /
जो जोडील ओवी मराठी /
तयाने अमृताचिए ताटी /
जाण नरोटी / ठेविली //

**– प्रा. अशोक बागवे**

भ्रमणध्वनी : ९६१९९७२७३२



# माझिया दारात चिमण्या आल्या

## रश्मी कशेळकर

चिमणीला चंकू कसं? कुठे? सापडलं कोण जाणे. अंगावर भरपूर भिस असलेलं चंकू होतं भानशेरू रंगाचं; पण वाऱ्यावर लोळणाऱ्या सावरीच्या गठ्ठ्यासारखं घरभर फिरायला लागलं की लक्ष त्याच्या चमकणाऱ्या डोळ्यांकडे जायचं आणि पुढचे दोन पाय अलगद जमिनीला लावत त्याचं सशासारखं उड्या मारणं लक्ष वेधून घ्यायचं.

''इलां कसां तां. कोणाचा तरी असांत. शोदूक् इले तं देवचा लागतंला. लोकांचा तां.''

अगोदरच घरात ही प्रजाती सहन करत असलेली म्हातारी बोलली.

''आजी, तू बोलां नको हां. तां आपल्याकडे इलंला हां. आपण काय कोणाचा घितलंला नाय हां नि आता तां आमचा झालंला हां.'' या चिमणीनं ठणकावलं.

''अगो, पण त्येची आवस त्येका शोदीत असतंली. ता बं कसा कावरा-बावरां झालां तां.''

''काय नाय, गे आये ..आजयेक् सांग जरा गप ऱ्हवाक्. हिका काय त्येची आडचण होतां?''

''बरां तं मी नाय काय बोलंत.''

''मी शाळेत गेल्यावर  त्येका मारायचा नाय, कळंला काय? त्येकां वरडायचा नाय.'' कंबरेवर हात ठेवलेली चिमणी बोट वर करून दटावत होती.

''बरां. तां पानचुलयेत हगान ठेवतां. तां काढलां तर चलांत?''

चिमणीचे डोळे मोठे झाले. बोलायला काही सुचेना.

चिमणी उत्तर शोधू लागली.. खरं तर तिला ते सापडलेलं होतं. ती दुसरा विषय शोधू लागली.

''तुझी सीरियल लाव? आई कुठे काय करते?''

''तू नको लावक्. ती माझी मी लावीन. अब्यासाक् जा गो साळग्या. त्या मंकीक् ठेव खाली.''

''मंकी न्हय गे त्येचा नाव. चंकू. मंकी म्हंजे काय तां तुका म्हायत हां?''

बारीच्या लाकडी रेंजांना पीळ टाकून गोकर्णीची वेल झडीच्या पत्र्यावर चढली होती. झडप बंद करता येईना हे लक्षात आलं ते पावसाची झड आत यायला लागली तेव्हा. वर्षाचे सातएक महिने उकाड्याचे आणि पाच महिने धडधडीत पावसाचे. त्यात पाखरांना घरटं करायला ते दाट झुडुप सुरक्षित वाटे. बारीचे रेजे बारीक वाटत इतकी ती वेल जाड झाली होती.

''पीळ कसलो दिसतां! काळोखात हात पडलो तं दचकात एकादो.'' शेजारचा अगदी नेहमी येणारा हे बोले.

आजी पाखडायला बसली की ती धीट पंख तुटकी चिमणी येई. कोंबडीच्या पिलासारखी जमिनीसरशी उडणारी ती या गोकर्णीच्या झुडपात संसार थाटी.

''गे तिच्या चोचीत बगलं? सुरूची पानां आणतां. जवळची कसली तरी पानां आणायची की नाय. इतकी आसंत. समुद्रार खंय लांम जाता.''

''गेल्या खेपेक् दोन कवटां घातल्यांन होती.''

''गे तू सारक्या बगू नको हां. मगे घाबरात ती.''

''मी नाय बाय. तुजेच बाई खयची खयची गाणी म्हणत हय बसतंत. माका आपली टकली टेकूची असतां तं ती गात बसतां.''

आणि ती गाणी गाणारी आलीच.

''काय वो येव काय? तुमच्याकडे बऱ्यो हे चिमणे येतंत. मांजरांका भियत नायत.''

''त्ये गावतंले हत मांजरांका?'' आजी आडवी झाली.

''ए चिमणे, गाणं आवडलं का? बघ हां उद्या वर्गात तुलाच उठवणार.''

चिमणीनं मूठभर तांदळाच्या कण्या आणल्या आणि खळ्यात उडवल्या.

''ए, अशा फेकायच्या नाहीत. डबा लावलेला आहे ना? त्यात घाल. त्या हवे तेव्हा खातील.''

चिमण्या आल्या.

''गे आजी, उट. बाईंशी बोल. मी खेळाक् जातंय.''

''इथेच खेळा ग. मी आहे. आजीला झोपू दे.'' पायठणीवर केसांशी चाळा करत बसलेल्या बाई गुणगुणत होत्या.

खळ्यात वाडीतल्या चिमण्या जमल्या.
शिवाजी म्हणतो दोन उड्या मारा.
शिवाजी म्हणतो तोंडावर बोट ठेवा.

शिवाजी म्हणतो रडा.

शिवाजी म्हणतो हसा.

बाई खेळ बघत बसल्या, गुणगुणायचं थांबल्या.

हाच खेळ आम्ही खेळत होतो. तेव्हा शिवाजी व्हायला मजा यायची.

''काय गं चिमण्यांनो, असला कसला तुमचा शिवाजी तुला काय करायला आवडतं, असं नाही विचारत?''

चिमण्यांचे डोळे विस्फारले. त्या एकमेकिंकडे पाहू लागल्या.

''शिवाजी राजा आहे ना? तो ऑर्डर सोडणार.''

''पण शिवाजी राजा आता कुठेय?'' दुसरी चिमणी.

''हो. शिवाजी एक उत्तम राजा होता तो तुम्हाला सांगेल मुलांनो, तुम्हाला काय काय करावसं वाटतं?''

''बाई, तुम्ही शिवाजी व्हा ना.''

''नाही. शिवाजी तुमच्यातला. चला खेळा पाहू..''

''शिवाजी विचारतोय कोणाला गोष्ट सांगायची आहे?''

''मला.''

''बरं ये इकडे. आणि गोष्ट स्वतः रचून सांगायची.''

''ही या आमच्या पंख तुटक्या चिमणीची गोष्ट आहे. या चिमणीचे आईबाबा या आमच्या गोकर्णीच्या वेलीवर राहात होते. आमच्याकडे एक काळं माऊ होतं. त्याला आम्ही काळू म्हणत असू. पण, एकदा शाळेत बाई म्हणाल्या कोणाला त्याच्या रंगावरून नाव ठेवायचं नाही. मग मी त्याचं नाव गोटू ठेवलं. तर तो गोटू शिकार करायचा ती पाखरांची. खळ्यातल्या या पायरीवर जास्वंदीच्या झुडपात दबा धरून बसायचा आणि फुलांतला मध चाखायला येणाऱ्या पाखरांना झडप घालून पकडायचा. गळ्यावर गुलाबपाकळी असलेल्या सूर्यपक्षाला त्यानं मारलं म्हणून बाबांनी त्याला तिथं बसल्यावर फटके द्यायला सुरुवात केली. पण तो पाखरं पकडायचाच. आजी पडवीत तांदुळ घोळत बसली की या दारातल्या जुईच्या मांडवावरून चिमण्या खाली उतरायच्या आणि मी मुठी मुठी कण्या टाकायची. आजीचा ओरडा पडे पण या चिमण्यांना खाण्यासारखं आमच्या बागेत काहीच नव्हतं.''

''बाई, कंटाळा आला. बास झाली हिची गोष्ट. ही शाळेतपण आम्हांला हेच सांगत असते. सगळं रचून सांगते.''

''हो बाई, आपल्या पदरचं काहीही सांगते.''

''बरं, तुम्हाला तिची गोष्ट ऐकायची नाहीय तर. तुला काय वाटतंय गं चिमणे? तुझी गोष्ट जुनी झालीय?''

चिमणी खाली बसली.

''शिवाजी विचारतोय कोणाला गाणं म्हणायचंय?''

चिमण्यांचा खेळ रंगला.

ज्याला जे हवं ते ते त्यानं करायचं, बाकिच्यांनी आवडलं तर टाळ्या वाजवायच्या.

टाळ्यांच्या आवाजानं आणि चिमण्यांच्या कलकलाटानं खळं भरून गेलं.

पंख तुटकी चिमणी वाळक्या गवतातल्या मऊ मऊ धुळीत लोळत होती आणि तिच्या सोबत घरटं बांधणारा तिचा जोडीदार होता. आणखी चार-पाच चिमण्या आल्या. त्याही धुळीची अंघोळ करू लागल्या.

''बाई, चिमण्यांचा शिवाजी असतो?''

''काय माहीत. असेलही. तुम्ही शोधा.''

''बाई, ही तुटक्या पाकाची गोकर्णीतली चिमणी आहे ना, ती माडाच्या अळ्यात गेली की बाकीच्या अंघोळीला येतात. आजी पडवीत दाणे नीट करायला बसली की ही सगळ्यांना बोलावून घेते म्हणजे ही त्यांची शिवाजी असणार.''

''ज्याला कोणाला पाणी दिसेल, दाणे दिसेल तो इतरांना सांगतो. तो त्यावेळी शिवाजी होतो.''

सगळी पाखरं खेळून आपापल्या घरी गेली.

''चिमणे, ये मला तुझी गोष्ट सांग.'' बाईंनी चिमणीला जवळ घेतलं.

''वो बाईनु, त्येका जेवक् सांगा. चिमणीचा जेवाण आसां. दशा बगां काय झालंली हां ती. ह्येची मांज्रा चार-चारदा रेटवतंत. माश्याशिवाय त्येंचो घास जायत नाय.'' आजी करवादली.

चिमणी गालावर बोट हलवत पायरीवर बसली.

''तर मी कुठे बरं आले होते?''

''आठव.''

''हां तर चिमण्या रोज पडवीत यायच्या. आणि मी वाचलेलं की पावसात त्यांना दाणे मिळतच नाहीत म्हणून मी त्यांच्यासाठी मेढीला डबा बांधला. डबा मोठा होता. चिमण्या आत उतरायच्या,कोणाची जाग आली की सुळ्कन पळायच्या. गोटूचं बरोबर लक्ष होतं. बाई मी हे खरं सांगतेय आजिबात माझ्या पदरचं नाही. तर ही चिमणी आत गेली आणि ती बाहेर पडणार इतक्यात गोटूनं तिच्यावर झडप घातली. मी ओरडायला लागले. गोटू गुरगुरत होता. तिचा पंख त्याच्या तोंडात होता. ती ओरडत होती.''

''अरे गोटू सोड सोड. माझा पंख आहे तो. मी उडणार कशी?'' इतक्यात आजी

आली आणि तिनं गोटूला चांगलाच फटकवला. चिमणीला हळदपट्टी केली. तिला टोपलीखाली झाकून ठेवली. आम्ही तिला पीठ कालवून पाजत होतो. आम्हांला वाटलं ती मरणार पण ती बरी झाली. आणि आता ती इथंच आहे या गोकर्णीच्या वेलीवर.''

''चिमणे, असे बरेच पक्षी आपल्यासोबत असतील. पण या तुटलेल्या पंखामुळे आपण या चिमणीला ओळखतो.''

शेजारच्या बाई घरी गेल्या आणि त्यांनी चिमण्यांसाठी दारातल्या पारिजातकाला वेळणी बांधली.

आता या वेळणीच्या झुल्यात त्या सुरक्षित दाणे टिपतील.

माझिया दारात चिमण्या आल्या, अबोल काहीसे बोलून गेल्या
कळले सारे नि कळले नाही, मनाची अबोध हासली जुई
दाटून दिशांत उतला गंध, झडली जाणीव गळले बंध
प्राणांस फुटले अद्‌भुत पंख, तंद्रीत भिनला आकाशडंख
माझिया दारात चिमण्या आल्या, आगळेवेगळे सांगून गेल्या.

''आजये, बाई गाणं म्हणतंत नि हसत ऱ्हवतंत. आपल्यो चिमण्यो त्येंच्येकडे नाय ना जावचे?''

''गेले तं गेले. ते काय ऱ्हवाचे नायत. त्येंचा घर हय असा.''

''आजी, तुका येतां काय गे गाणां?''

''नाय गे माजे बाय. माका फक्त चिमणी कावळ्याची गोष्ट येता.''

चंकू उड्या मारत होता. खुर्चीवरून टेबलावर नि टेबलावरून खिडकीवर. गोकर्णाच्या वेलीवर तो नखांना धार काढी. डोकं रेजांतून बाहेर काढून तो वेलीतल्या हालचाली टक लावून पाहात राही.

''बाईनु, या खेपेक् तुटक्या पाकाच्या चिमणेक् दोन पिलां होतली.''

''मी काय सांगितलंय. तिचा पंख तुटला म्हणून तिला तू नाव ठेवशील? तुला कुणी दात पडकी म्हटलं तर चालेल?''

''मं काय नाव देवया?''

''तू बोल.''

''ठकुली.''

''छान.''

''ठकू म्हणा गो तिकां.'' आजी बोलली.

ठकुली गोल गरगरीत झाली होती. डब्यातले दाणे टिपण्यापेक्षा तिला झाडावर टांगलेली थाळी बरी पडे. बाईंनी पाणी ठेवलं होतं.

आरसा वापरून झाला की त्या त्यावर कपडा टाकून ठेवत. कपाटाच्या आरशावर आठवणीनं पडदा ओढत.

''बाई, ठकुली आरशावर चोच मारायची तेव्हा आम्ही तिची फजिती पाहुन हसायचो. चंकूलाही हसतो. पण तो आरशाला काही करत नाही. ठकुलीची चोच दुखत असेल.''

बाई
चिमणीबाई
आवर सावर
ही आदळआपट
तडफड फडफड
ही अविरत टकटक
आरशावरची

तुझ्या चोचीत दिसणारं
रक्त पाहून
प्रेम नावाच्या जादूची
भीती वाटते

तहान भागव
निदान गळ्यातली
पाण्याला तोंड लाव
चिऊताई

स्वप्नांच्या लिपीवर
सांडणाऱ्या शाईसारखा
काळोख पसरतोय आता

वाळलेल्या गवताच्या काड्यांनी
घरटं नको सजवू घाईनं

बाई
चिमणीबाई
आरसा झाकून टाक

अंधाराचं बोट धरल्याशिवाय
आरशाच्या कैदेतून सुटका नसते
कोणाचीच

''आता समजलं ना?''
बाई गुणगुणत होत्या.. त्यांच्या पावलांना नाद होता.

''चिमणे, ऐकलं गो..बाईंकां कायतरी झालां हां.''
''काय गे?''
''तुका नाय कळांचा. चिमण्यो दारात इले ना की सगळो आनंद घरादारांत फिरतां.''
''गे आजये, तुजी निस्ती बडबड चालू. थांब ऐक.''

इवलीशी
फुलकीशी
दहावीस जायकळ्यांच्या
भाराएवढी
हलकीशी
चिमणी भुरी– जराशी
भुरभुर फुलली
सकाळच्या
थुईथुई वाऱ्यावर
आणि बसली
मऊपराग पिसे लावून
गुलाबाच्या गालाशी
आणि झुलली
कळ्या फुलांनी
डुचमळलेल्या वेलीवर

जरा उडून
पिंगा घालून तिनं टिपल्या
हावऱ्यानं
गवतातल्या साखरटिकल्या
आणि उरल्या
तिच्या पायगुणांच्या
खुणाच अशा
ओझरत्या चारच फुल्या
फुल्या कसल्या?
दवभाबड्या मातीच्या
बाळभोळ्या
कळ्याच त्या

''बाई, चिमण्यांचा गाणां म्हणतंहत..''

''गे आजये, कविता तें कोणाकोणाचे.''

''गो व्हयतो तुझो मंकू बगुचो तेव्हा खिंडकेवर. घरट्यात ये जा असतां. कधी झडप घालीत काय कळांचा नाय.''

''बग गे आये, आजी नरटी लावतां मागे ती बोलली म्हणान लगेच त्याच दिवसाक् चिमणेचो पंख गेलो. मी नाय जा! तिकां गप ऱ्हवाक सांग.''

''चिमणे, का करवादतेयस?'' बाईंचा आवाज आला.

'चंकूवर लक्ष ठेवायला हवं. पण लक्ष रात्री कसं ठेवणार? खिडकी कशी लावणार? या अंड्यातून पिलं बाहेर येणार कधी? त्यांना पंख फुटणार कधी? आणि ती उडणार कधी? पण तोपर्यंत या ठकुलीचं काही खरं नाही. बरं ती दुसरीकडे का नाही बांधत घरटं? माडावर घरटं बांधायचं नाहीतर पोफळीवर.' चिमणी त्या खिडकीजवळच असे.

घरट्यात आवाज येतांहा गे
चंकू कसो खुळ्यासारो करताहां

''चंकूक् आता मासळी बाजारात सोडूया.''

''नको नको. माका चंकू होयो नि ठकुलीपण होई.'' घरात रोज रडण्याचा

आवाज येई.

चिमणीला समजावण्यात सगळ्यांचा वेळ जाई.

आणि त्या दिवशी दुपारी ती खिडकीजवळ टेबलावर डोकं टेकून झोपली होती. वेलीवर चढलेला चंकू घासकन् खाली आला तो ओरडत, घाबरलेला, थरथरत. पाठचं दार उघडून त्याला आणायला जाईपर्यंत तो घसरत भिंत ओरबाडत खाली पडला. चिमण्यांचा थवा त्याच्या आजुबाजूला कर्कश ओरडत होता.

चंकूचा डोळा रक्त येत होतं त्यातून.

चिमणी कळवळली.

''आजये बग गे.. आपल्या चंकूचो डोळो फोडल्यांनी...''

शेजारच्या बाई गात होत्या.

कळले सारे नि कळले काही, मनाची अबोध हासली जुई

त्यांच्या गोड आवाजाने चिमणीला अधिकच रडू फुटलं..

**– रश्मी कशेळकर**

भ्रमणध्वनी : ९४२१४४२३१६

# अभिप्राय

नमस्कार,

साहित्यचा फे–मा–ए–२०२२चा अंक मिळाला.

संपादक म्हणून उत्कृष्ट साहित्याची निवड केल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.

मी गेली कित्येक वर्षे साहित्यचा वर्गणीदार आणि लेखक /कवी आहे. मात्र कोविडमुळे गेली दोन वर्षे वर्गणी भरली नव्हती. आता पुढील दोन वर्षांची वर्गणी रुपये ३००/– लवकरच अकाउंटमध्ये जमा करतो.

**– अशोक लोटणकर**

---

अंक मिळाला. मनःपूर्वक धन्यवाद. सगळेच लेख छान आहेत, विशेषतः डॉ. मृदुला दाढे जोशी यांचा आणि नीति मेहेंदळे यांचा लेख विशेष आवडला.

**– चित्रा वाघ**

# एक समंजस काळोख...

## सतीश सोळांकूरकर

सकाळी नेहमीप्रमाणे तिठ्यावर गेले. बसून राहिले. टपालगाडी आली. पोस्टमनकाका खाली उतरले. लोकांचा गराडा होता त्यांच्यासमोर. त्यांनी माझ्याकडे पाहिले. ते त्यांचे माझ्याकडे तसे पाहणे म्हणजे – माझेही पत्र आले आहे याची गोड बातमी. मी हरखून गेले. तुझेच पत्र असणार. खात्रीच होती माझी. तू सोडून दुसरे कोण आहे माझे जे माझी आठवण काढेल, मला पत्र लिहील? मी खूप आनंदात होते. सगळ्यांची पत्रे, कोणाकोणाची मनीऑर्डर देऊन झाल्यानंतर पोस्टमनकाकांनी मला खूण केली. मी त्यांच्याजवळ गेले. त्यांनी मला तुझे पत्र दिले. माझ्या चेहऱ्यावरचा आनंद पाहत राहिले. खरे तर हे पोस्टमनकाका म्हणजे आधीच्या पोस्टमनकाकांचा मुलगा आहे. तरुण आहे तसा पण सगळे त्यालाही पोस्टमनकाका असेच म्हणतात. दोन वर्षांपूर्वी आधीच्या पोस्टमनकाकांचा अपघाती मृत्यू झाला आणि त्यांच्या जागेवर त्यांचा मुलगा कामाला लागला. अगदी शाळकरी वयापासूनच तो अनेक वेळा पोस्टमनकाकांसोबत इथे येत असे. तेव्हापासून सगळे गाव त्याला ओळखते. आता, युनिफॉर्ममध्ये तो पूर्वीच्या पोस्टमनकाकांसारखाच दिसतो, तसेच बोलतो–वागतो सर्वांशी. त्याचे डोळे खूप बोलके आहेत.

मी पत्र छातीशी कवटाळले. जणू काही तुलाच घेते आहे कवळून... मागच्यावेळी तू रागावून माझा निरोप घेतला होतास. निघताना, मलाही सोबत घेऊन चल असा मी तगादा लावला होता. पुढच्या वेळी नक्की हं.. असे तू सहज म्हणालास आणि माझा त्रागा झाला होता. पुढच्या वेळी, पुढच्या वेळी असे प्रत्येक खेपेला म्हणतोस आणि नेत मात्र नाहीस. नेमकी कधी येणार तुझी ती पुढची वेळ? असे म्हणून मी राग राग केला होता तुझा. त्या संध्याकाळी तू माझा निरोप घेतलास. हळूहळू अंधारात दिसेनासा झालास. मला तिठ्यापर्यंत सोबतही करू दिली नाहीस... त्यानंतर तुझी काहीही खबरबात नव्हती. आता सगळे संपून गेले आहे असे वाटत राहिले होते मला. मी तसे बोलायला नको होते असेही वाटत राहिले होते. माझा

तुझ्यावर विश्वास नाही का, असे तू म्हणालास.. आठवते? आणि मग अबोलसा होत गेलास. तुझी कशी समजूत काढावी ते मला सुचेना. तू दुखावला गेला होतास. मी स्वत:लाच दोष देत बसले. स्वत:ला शिक्षा करत बसले. तू गेल्यानंतर एखाद्या महिन्याने का होईना तुझे पत्र यायचे, काही खुशाली समजायची; पण आता जवळजवळ सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ लोटला होता आणि आज इतक्या दिवसानंतर तुझे पत्र माझ्या हातात होते.

मी सरळ शांभवीदेवीच्या देवळात गेले. पत्र तिच्या पायाजवळ ठेवले. हात जोडले. समईचा मंद उजेड देवीच्या चेहऱ्यावर पसरला होता. गाभाऱ्यातला ध्यानस्थ थंडावा मला लपेटून घेत होता. वाटत होते – मी त्या ध्यानमग्नतेचाच एक भाग झाले आहे आणि तो झिलई थंडावा माझ्या सर्वांगातून झिरपत जातो आहे. तू गेल्यानंतरच्या कित्येक रात्री मी देवीच्या पायरीशी जागून काढल्या होत्या. तुला तसे बोलले, त्या दिवशी, त्याबद्दल तिच्याकडे माफी मागत राहिले होते. तू मला माफ करावेस आणि निदान दोन ओळीचे का होईन तुझे एक पत्र यावे असे मी तिला विनवत राहिले होते. कितीतरी नवस बोलत राहिले होते. देवीला माझी कळकळ समजली आणि आज तुझे पत्र माझ्याजवळ आले. मी शांतपणे शांभवीमातेकडे पाहत होते. तिच्या उजव्या हातातले फूल पटकन माझ्या जवळ येऊन पडले. देवीने उजवा कौल दिला होता. नक्कीच काहीतरी चांगली बातमी असणार होती या पत्रात.. तू मला माफ केले असावेस. तुझा राग गेला असावा. तू मला न्यायला येणार असावास.. माझे मन गिरक्या घेऊ लागले. मी तशीच बसून राहिले कितीतरी वेळ..

शांतपणे उठले. देवीसमोर प्रसाद म्हणून ठेवलेली चिमूटभर साखर उचलली, तिला बिलगलेल्या काळ्याशार मुंग्या झटकल्या आणि तशीच तोंडात टाकली. उदबत्तीच्या तबकातील अंगारा कपाळाला लावला. परत एकदा नमस्कार केला. पत्र घेतले आणि बाहेर पडले. तुझे पत्र माझ्याजवळ होते. त्याची ऊब मला जाणवत होती. जणू काही तू चालतो आहेस सोबत असे वाटत होते. मी चालत राहिले. तुझे पत्र मी छातीजवळ गच्च कवटाळून धरले होते.

कोणीतरी ओढल्यासारखी मी नदीकाठच्या उंबराच्या झाडाजवळ आले. उंबराला टेकून बसले. तुझे पत्र असलेले पाकीट समोर ठेवले. लगेचच उचलले. नको, माती लागेल त्याला असे म्हणून परत हातात घेतले. अक्षर तुझे होते. तू नेमके कुठून पत्र पाठवले असावेस याचा मी अदमास घेत होते. पोस्टाचा पुसटचा शिक्का दिसत होता. पण, त्यावरून काही समजत नव्हते. तारीखही स्पष्ट दिसत नव्हती. नेमके हे पत्र तू कधी टाकले आहेस याचाही काही अंदाज येत नव्हता. तसा माझा एक ठिकाणा असत नाही आणि पत्राच्या शिक्क्यावरून मी नेमके त्याच गावातून पत्र टाकले असावे

किंवा अमुक अमुक अशा तारखेला पत्र पाठवले असावे असे समजू नकोस. अनेक वेळा माझी पत्रे इतर कोणाकडून तरी पोस्टापर्यंत पोचवली जातात. मला जाता येतेच असे नाही पोस्टाकडे.... आतल्या मजकुराबरोबर लिहिलेलीच ती तारीख खरी असते – असे तू मला एकदा सांगितले होतेस. अर्थात या गोष्टी माझ्यासाठी महत्त्वाच्या अशा कधीच नव्हत्या. तुझे पत्र येणे हाच माझ्यासाठी सुगीचा हंगाम होता आणि आज तुझे पत्र माझ्याजवळ होते – माझा सुगीचा हंगाम सुरू झाला होता...

मी परत परत तुझे पत्र पाहत राहिले. पण, का कोण जाणे उघडायचे धाडसच होईना. एक अनामिकशी भीती दाटून राहिली होती आत. छाती धडधडत होती. या वेळी निरोप घेताना मी घातलेला गोंधळ काही केल्या माझ्या मनातून जात नव्हता. तो राग मनात धरून तू काही निर्वाणीचे तर लिहिले नसशील ना पत्रात? मला खूप अस्वस्थ वाटायला लागले. तिन्हीसांज होऊन नदीच्या पार गेली होती. मी उठले. शांतपणे चालत राहिले. माझ्याच घराकडे पोहोचले आहे असे समजून भलत्याच कोणाच्यातरी घरासमोर येऊन उभी राहिले. निघताना मी माझ्या घराला कुलूप लावले होते, पण आता समोरचे घर तर उघडे दिसत होते. कदाचित तूच आला असशील आणि शांतपणे घरात बसला असशील असे वाटले मला एकदा. कुलपाची एक चावी तुझ्याकडेही होती. मग कोणाचेतरी वेगळेच आवाज ऐकू येऊ लागले आणि मी भानावर आले. माघारी फिरले. डावा पाय जरा ठणकत असल्यासारखे वाटत होते. मी थांबले वाटेत. बसले एका जवळच्या दगडावर. पायात काहीतरी घुसले होते खोल, बहुधा काच असावी. पण, पाय अनवाणी कसे माझे? माझी चप्पल? निघताना मी चप्पल घालून निघाले होते. हां, शांभवीदेवीच्या देवळात गेले, चप्पल बाहेर काढून ठेवली आणि तशीच अनवाणी बाहेर पडले असावे तुझ्या पत्राच्या नादात. परंतु काच घुसली तळव्यात ते जाणवले कसे नाही मला...? मी तशीच लंगडत लंगडत माझ्या घराजवळ आले. अंधारात कोणीतरी बसले होते. कोण असावे? तू? परत चकवा. मी समजावले स्वत:ला. हळूहळू पुढे झाले तर – तूच – समोर. पायरीवर बसलेला, पाय लांब करून. बाजूला सॅक, टोपी. मी स्वत:ला चाचपून पाहिले. तू? अरे.. तू कधी आलास.. आणि आत का नाही गेलास? अग, चावी विसरलो तिकडेच. ते जाऊ दे. तू कुठे भटकते आहेस इतक्या रात्रीची? हातात काय आहे ते? आणि लंगडते आहेस ना? काय झाले? तुझे प्रश्न सुरू झाले. तू समोर आहेस माझ्या हे समजायला मला जरा अधिकच वेळ जावा लागला.

हाताला धरून तू मला आत नेलेस. हळुवारपणे तळव्यात घुसलेली काच काढलीस. चिमूटभर हळद दाबून धरलीस जखमेवर. अचानक तुझे लक्ष माझ्या हातातल्या पाकिटाकडे गेले. पाकीट कसले धरून ठेवले आहेस? पत्र आहे का

कोणाचे? बघू? अरे, हे तर माझेच पत्र वाटते. तू वाचले नाहीस का? अशीच घेऊन फिरते आहेस? अग, वाचायचे तरी होते. मी आज येणार असे लिहिले आहे त्यात. तू ... ना...? अरे. आज सकाळीच मिळाले आहे. कधी वाचणार? खरे सांगू मला हे पत्र उघडायचे धाडसच होत नव्हते.. धाडसच होत नव्हते म्हणजे? का बरं? मला वाटले - मागच्या वेळी तू रागानं गेलास तर यामध्ये काहीतरी वेगळे लिहिले असशील तू. वेगळा म्हणजे? म्हणजे मला विसरून जा. मी आता परत येणार नाही वगैरे वगैरे. व्वा! काय विश्वास आहे माझ्यावर तुझा.. ये अशी इथे. हां. उघड ते पाकीट. वाच आता. मी येणार आहे एवढाच मजकूर नाही आहे त्यात - तर यावेळी आपण सोबत जाणार आहोत असेही लिहिले आहे मॅडम. जरा वाचा ते. मी पाहतच राहिले तुझ्याकडे. खरेच? तू घेऊन जाणार मला? यावेळी? मला काय बोलावे; काय करावे ते सुचेना.. मी पाहतच राहिले वेड्यासारखी तुझ्याकडे. परत परत वाचत राहिले त्या ओळी. मी येणार आहे आणि तुला सोबत घेऊन जाणार आहेस. कितीतरी वेळ मी त्या ओळींवरून हात फिरवत राहिले. परत परत वाचत राहिले. तू घेऊन जाणार मला.. खरंच शांभवीदेवीची कृपा. उद्या आधी देवळात जायचे सकाळी. तिचे सगळे नवस फेडून टाकायचे. मी स्वत:शीच बोलल्यासारखे काहीतरी बोलत राहिले... कधी तुझ्याकडे तर कधी तुझ्या पत्राकडे पाहत राहिले... आणि कसला तरी आवाज झाला मोठ्ठा... - मी ताडकन उठले - काहीतरी पडले असावे खाली, मांजराने काहीतरी पाडले असावे. मँव मँव करत ते कुठेतरी गुडुप झाले अंधारात - त्याच्या ओरडण्याचा कातर आवाज मात्र घुमत राहिला घरभर.

पण मी एकटीच? तू? दिवसभर छातीशी कवटाळून असलेले ते पत्र? शांभवीदेवीचा कौल? मला सोबत घेऊन जायला आलेला तू? मला काहीच समजेना.. मी भानावर आले. काहीच खरे नव्हते का ते? तू आलाच नव्हतास का इथे? भास होता का सर्व तो? मी स्वप्न पाहत होते का? किती वेळ होते मी स्वप्नात? सगळे स्वप्नच होते का ते? मग या आधी तू जे येत होतास इथे माझ्याकडे ते तरी खरे होते का? की तेही स्वप्नच? माझ्या सर्वांगातली शक्तीच गळून गेल्यासारखे झाले होते. माझे सगळे अंग घामाने डबडबले होते. मी उठले तशीच धडपडत, दरवाजाकडे आले - कसलाही आवाज नव्हता - चिडीचूप शांतता आणि बाहेर दबा धरून बसलेला... गूढ काळोख... समंजस ..

**– सतीश सोळांकूरकर**
भ्रमणध्वनी : ९३२४३६३९३४

# हंबरडा

## मनीष पाटील

तिघांनी मिळून दिनेशला कसंतरी पेलत झोपण्याच्या खोलीतील पलंगावरून उचलून बैठकीच्या खोलीत अंथरलेल्या जुन्या चादरीवर आणून ठेवलं. पलंगावरून उचलून त्याला बैठकीत आणेपर्यंत त्यांना दम लागला आणि दिनेशला भीती होती तसंच झालं. खाली ठेवता ठेवता पाय धरणाऱ्याच्या हातातून त्याचा एक पाय सुटला आणि दिनेश आपटला. त्याच्या कंबरेला मार लागला.

'हळू रे हळू! आयुष्यानं कितीदा तरी कंबरडं मोडलं आतापर्यंत. निदान शेवटी तुम्ही त्याचे तुकडे तुकडे तरी नका करू.' तो मनातच कळवळला. तसं त्याचं बोलणं आता कोणाला ऐकू जात नव्हतं. त्याचे फक्त डोळे, कान आणि मन काम करत होतं. बाकी सगळ्या हालचाली बंद झाल्या होत्या. तो आता फारफारतर तास दोन तासांचा सोबती आहे असं त्याला नियमित तपासायला येणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलं आणि निर्मलेनं म्हणजे त्याच्या बायकोनं परिसरात राहणाऱ्या नातेवाईकांना बोलावून घेतलं. त्यातल्या तिघांनी दिनेशला झोपण्याच्या खोलीतील पलंगावरून उचलून बैठकीत खाली अंथरलेल्या चादरीवर आणून ठेवलं. खाली टाकलेल्या चादरीचा अंदाज आल्यावर दिनेशच्या मनात विचार आला,

'च्या मारी! वर काही नेता येत नाही हे बरोबर आहे पण बायकोनं खाली मऊ गोधडी अंथरली असती तर काय बिघडलं असतं?'

नंतर बराच वेळ तो डोळे मिटून पडून राहिला. उशाशी बायको, मुलं बसून होती. डॉक्टरांनी सांगून दोन तास उलटून गेले पण दिनेश अजून जिवंत होता. त्यामुळे जमलेल्यांची चुळबुळ सुरू झाली. 'लवकर गेला तर लवकर मोकळं होता येईल' असा विचार प्रत्येकाच्या मनात घोळू लागला. पण कोणाच्या हातात काही नसल्यानं सर्व जण नाइलाजानं दु:खी चेहरा करून, एकमेकांची तोंडं मख्खपणे बघत बाहेर बसून राहिले. जसजशी वेळ जात होती तसतसे ते अस्वस्थ होत होते. दिनेश बराच वेळ डोळे मिटून पडलेला राहिल्यानं त्या सर्वांच्या आशा पल्लवित झाल्या. लांबूनच अंदाज घेत

त्यांच्यात कुजबूज सुरू झाली.

'गेला वाटतं.' एक जण कुजबुजला.

'गेला?....पटापट आटपून घ्यायला पाहिजे सगळं म्हणजे लोक मोकळे होऊन जातील.'

'लोकांना निरोप द्यावे लागतील. लोक जमतील तोवर आपण न्यायची तयारी करू.' तिरड्या बांधायचा बराच अनुभव असलेला एक जण बोलला. इतका वेळ आळसावलेल्या त्या लोकांत थोडं चैतन्य निर्माण झालं. त्यातले काही जण आत डोकावून बघू लागले. दिनेशच्या इतर अवयवांची शक्ती त्याच्या कानांत व डोळ्यांत आलेली होती. लांबूनही त्याला कुजबूज स्पष्ट ऐकू आली. तो मनात हसला. त्यानं डोळे उघडले आणि समोर दिसणाऱ्या सर्वांवर फिरवले. मोठ्या आशेनं डोकावून बघणारे दुप्पट निराशेनं खाली बसले.

'आहे धुगधुगी थोडी', पहिला हलकेच म्हणाला. दिनेशला मोठी गंमत वाटली. तो डोळे उघडे ठेवून पडून राहिला. सगळीकडे निरोप गेलेले होतेच, 'दिनेशची प्रकृती गंभीर आहे' हा निरोप सुधारणा होत होत बऱ्याच लोकांपर्यंत पोहचता पोहचता दिनेश गेला' असा झाला होता. त्यामुळे शहरातले नातेवाईक जमू लागले होते. मामा-मामी, काका, भाऊ, बहीण असे काही नातेवाईक दिनेशभोवती कोंडाळं करून बसले. बराच वेळ झाला. आधीपासून जमलेले लोक फारच कंटाळले. दिनेशला खाली ठेवूनही आता दोनेक तास उलटून गेले होते. म्हणजे डॉक्टरांनी भाकीत वर्तवल्यापासून जवळजवळ चार तास!

'डॉक्टर तास दोन तास बोलले होते आणि ४-५ तास झाले तरी माणूस जात नाही? कमाल आहे बुवा! असा कसा डॉक्टर आहे तो?' एक जण हलकेच म्हणाला.

'पैसे भरून डॉक्टर झालेल्या लोकांकडून काय अपेक्षा करता हो तुम्ही?' पेंगणाऱ्या एकानं मधेच आपलं वाक्य फेकलं.

'काय माहित. इतका वेळ लागेल माहीत असतं तर कामं आटपूनच आलो असतो. पण निरोप मिळाला आणि धावतच आलो. म्हटलं चला आधी हे आटपून घेऊ..!' दुसरा बोलला.

'हो ना हो! माहीत असतं तर ऑफिसला जाऊन अर्धा दिवस तरी भरला असता.'

'पण कोणीतरी म्हणालं होतं की गेला'....!'

'तसा गेलाच आहे म्हणा! फक्त डोळे तर उघडझाप होताहेत. बाकी सगळं शरीर गेलंच आहे.'

लोकांची बाहेर कुजबूज सुरू झाली होती. दिनेशभोवती जशी जशी गर्दी वाढत होती तसं तसं 'दिनेश आहे की गेला' हा अंदाज घेणं बाहेरच्यांना कठीण जात होतं.

त्यामुळे त्यांचे कान आता घरातून कधी हंबरडा फुटतो इकडे लागले होते. पण हंबरडा काही फुटत नव्हता आणि जमलेल्यांची अस्वस्थता वाढत होती.

''कशात अडकला आहे दिनेशचा जीव काय माहीत.' असं कोणीतरी कुजबुजलं आणि अति अस्वस्थ झालेल्या एकाच्या डोक्यात लख्खकन वीज चमकली. त्यानं पटकन दिनेशभोवती बसलेल्यांना आवाज दिला,

'अरेऽ, भाऊचा जीव कशात अडकला आहे बघा जरा. काही इच्छाबिच्छा अपूर्ण आहे का विचारा आणि हात जोडून तुझ्या सगळ्या इच्छा आम्ही पूर्ण करू, सुखानं जा, काळजी करू नको' असं सांगा. तेव्हाच भाऊ सुखानं डोळे मिटेल. तेवढ्यासाठीच जीव घुटमळतो आहे त्याचा.'

'दिनेशला तो जो कोणी होता त्याच्या बुद्धिचातुर्याचं कौतुक वाटलं. तो मनातच मोठ्यानं हसत म्हणाला, हा हा हा हा! अरे, ते तर माझ्या दहाव्याला तुम्ही कावळ्याला पण सांगू शकता!'

पण कोणा एकाच्या सुपीक डोक्यातून निघालेल्या या कल्पनेनं खूप वेळ वाट बघून कंटाळलेल्यांना फार बरं वाटलं. त्याच्याभोवती बसलेल्यांनाही ही कल्पना पटली. संधीचा फायदा उचलत बऱ्याच वेळापासून चुळबुळणाऱ्या दिनेशच्या मामीनं पुढाकार घेतला आणि ती हळुवारपणे बोलू लागली,

'दिनेश, मामांना तुम्हाला भेटायची खूप इच्छा होती....म्हणजे नेहमीच असायची. तुम्ही लाडके भाचे आहात त्यांचे आणि तुमचासुद्धा हा मामा खूप आवडता आहे. तुम्हालाही नेहमी त्यांना भेटावंसं वाटायचं.  पण दोघांनाही वेळंच मिळायचा नाही. आज ही अशी भेट झाली. असू द्या. भेट झाली हे महत्त्वाचं. आता आनंदानं डोळे मिटा. काळजी नका करू. दिनेशला भेटायचं, दिनेशला भेटायचं म्हणून सकाळपासून एक घासही पोटात टाकला नाही त्यांनी.' आणि मामाकडे वळून मामी म्हणाली, तुम्ही खाऊन घ्या तर हो थोडं, नाहीतर त्रास होईल तुम्हाला.'

प्रचंड दुःख झालं आहे असं भासवण्यासाठी पोक काढून भाच्याशेजारी बसलेला मामा मामीच्या प्रत्येक वाक्याबरोबर अधिकाधिक दीन होत, शक्य तेवढं पोक वाढवत दिनेशकडे भरल्या डोळ्यांनी बघत होता.

'चला हो, थोडं खाऊन घ्या.' मामी दिनेशजवळून उठत पुन्हा म्हणाली आणि दिनेशजवळून उठायला खूप कष्ट होत आहेत असं दाखवत, डोळे पुसत मामा उठून मामीच्या मागे गेला. दिनेशच्या मामा-मामीची नस ओळखणारे कुजबुजले,

'साला प्रसंग काय आणि यांना सुचतं काय!'

'दिनेश मनोमन हसला, जा रे मामा!....आणि जास्त पोक काढू नको नाहीतर इथेच मोडून पडशील. हा हा हा!....आणि हो वारंवार भरपेट खायची माझी एक इच्छा

राहिलेली आहे. पुढचे तेरा दिवस दिवसातून चार वेळ भरपेट खाऊन तू माझी ही इच्छा पूर्ण करशीलच याची मला खात्री आहे. तेराव्याला मामीला साडी आणि तुला कपडे निर्मला देईलच. पितर म्हणून आठवणीनं बैस म्हणजे तांब्याचा तांब्या आणि एक रुपयापण मिळेल. प्रत्येक नातेवाईकाच्या मर्तिकाला तेरा दिवस जाऊन राहणारे तुम्ही मेडिकल टूरिझम, फार्म टूरिझमसारखं 'डेथ टूरिझम' म्हणजेच आपल्या मराठीत मरण यात्रा' करता हे सर्वांना चांगलंच माहिती आहे. माझे पिंड तरी बिचाऱ्या कावळ्यांसाठी सोडा' अशी माझी तुम्हाला शेवटची विनंती आहे. जा. तुझं इच्छित कार्य आटपून घे. रामराम.'

'दिनेश, कसा आहेस बेटा?' मामा-मामीच्या रिकाम्या झालेल्या जागेवर बुड सरकवत थरथरत्या आवाजात त्याच्या शिल्लक राहिलेल्या एकमेव काकांनी प्रश्न केला. तसे त्यांच्यावर डोळे टेकवत तो म्हणाला,

'बोंबला! कसा आहे?' हा प्रश्न इथे लागू होतो का काका? किती दिखाऊपण भिनलेलं आहे तुमच्या अंगात?'

'अरे बेटा, मोठे काका गेले, तुझे बाबा गेले, काकू गेली आणि खरं म्हणजे आता मी जायला पाहिजे तर....तर....'

दिनेशचे डोळे हसले, अशिक्षित भावाला फसवून तुम्ही त्याचं घर बळकावलं काका. माझ्या बाबांनी मेहनतीनं उभा केलेला उद्योग नाना क्लृप्त्या करून तुम्ही हडपला. साध्याभोळ्या आत्यानं विश्वासानं तुमच्याकडे ठेवलेलं तिचं किडूकमिडूक तुमच्या घरातल्या उंदरांनी खाल्लं....अहो काका, अजून काही दुष्कर्म करायची बाकी आहेत का तुमची पृथ्वीवर? नाहीतर तुम्हीसुद्धा माझ्याबरोबर यावं, अशी माझी तुमच्यासाठीची शेवटची इच्छा आहे. हा हा हा हा...'

काकांनी त्याचा हात हातात घेतला, थोपटला, डोळे पुसले आणि मागे सरकून बसले.

'ओ हो हो हो! सालेराव तुम्ही?' पुढे आलेल्या बायकोच्या भावावर दृष्टी पडताच दिनेशच्या मनात उद्‌गार उठले. वा...वा...वा. सालेराव, आमच्या म्हणजे माझ्या व तुमच्या बहिणीच्या, लग्नानंतर माझी आर्थिक परिस्थिती ताडून तुम्ही योजनाबद्धरीत्या आपल्यात अंतर ठेवलं. आपल्यात तुम्ही नात्यांची वीण होऊच दिली नाही. २-५ रुपयांच्या हिशोबालासुद्धा काटेकोर राहिलात. पण परिस्थिती बदलत असते सालेराव! माझीही बदलली. तोपर्यंत वडिलोपार्जित मिळकत तुम्ही स्वत:च्या नावावर करून घेतली होती आणि मिळकत नावावर होताच बहीण-भावाच्या समान जबाबदाऱ्या तुम्हाला दिसू लागल्या. आई-वडिलांची काळजी घेण्याची जबाबदारी मुलीची सुद्धा असते, असे सुविचार तुम्हाला सुचू लागले. संबंधित कायद्यांची माहिती, व्हिडीओ क्लिप्स तुम्ही

न चुकता मला व्हॉट्सॲपवर पाठवू लागले. पण तोपर्यंत मीसुद्धा तुमच्यासारखा कोडगा झालो होतो. तुमचाच आदर्श होता ना माझ्यापुढे! असो. बहिणीचा वडिलोपार्जित मिळकतीतील हिस्सा तिला मिळावा, ही पण माझी एक शेवटची इच्छा आहे. जी पूर्ण होणार नाही, पण मी मात्र तुमच्यासाठी शेवटची प्रार्थना करतो की उरलेल्या आयुष्यात स्वार्थ सोडून थोडा तरी परमार्थ साधण्याची देव तुम्हाला बुद्धी देवो.'

शेवटची दृष्टी दिनेशवर फिरवून साला सोफ्यावर जाऊन बसला. दिनेशची बहीण केव्हाची दिनेशचे तळपाय चोळत रडत होती.

'रडू नको ताई. मी जाणार म्हणून रडतेस की यापुढे सणासुदीला ताटात भरघोस काही पडणार नाही म्हणून?! देवच जाणे! तुझं वागणं घरातल्या कुणालाच कधी कळलं नाही! रीतसर हिस्सा घेऊनही आई-वडिलांना सांभाळायची जबाबदारी तुझ्या लेखी फक्त भावांची राहिली. असो. तुझ्यापेक्षा तुझ्या नोकरीवर आणि माहेराहून तुला काय आणि किती मिळतं यावर प्रेम करणारा तो तुझा नवरा कुठे दिसत नाही?....सुटी मिळाली नसेल त्याला. परंतु मला भेटायची मनापासून इच्छा असती तर साला मेला, असं बेधडक सांगून त्यानं सुटी टाकली असती.! पण....असो. तुम्हा दोघांचा हावरटपणा माझ्या भाच्यांमधे उतरू नये, हीच माझी माझ्या भाच्यांसाठी शेवटची इच्छा.'

आता त्याची नजर भावावर पडली. भाऊ शून्यात बघत बसला होता.

'शेंडेफळ! मला भेटायला स्वत:च्याच बायकोला आणलंस ना? बऱ्याच महिन्यांत आपला फारसा संपर्क आला नाही. अजून काही नवीन लफडं वगैरे? सगळ्या कुटुंबाला समाजात मान वर करून चालणं अशक्य करून तू मात्र खोटे मुखवटे घालून मिरवत राहतोस. मुळातच लफडं करायची अक्कल तुला फार कमी वयात आली. मांजर डोळे मिटून दुध पितं रे पण जग तिला बघत असतं हे कसं विसरतो तू? आजवर किती आत्मे तळमळवलेस याचा तरी काही हिशोब ठेवलास का? कुटुंबाची मानहानी होईल असं वागू नको ही खरं तर फक्त माझीच नाही तर संपूर्ण कुटुंबाचीच सदाचीच इच्छा होती. जी तू कधीच पूर्ण केली नाही आणि यापुढेही करणार नाहीस याची खात्री आहे. तरीही यापुढे तरी तुझं वर्तन सुधारो आणि आई-वडिलांच्या आत्म्याला शांती मिळो, ही देवाकडे तुझ्यासाठी आणि आई वडिलांसाठी मी शेवटची प्रार्थना करतो. सुखी रहा आणि इतरांनाही राहू दे.'

दिनेशचे डोळे पोरांकडे वळले. जाणते होत असलेल्या पोरांचाच आता आपल्या बायकोला आधार आहे हे समाधान त्याच्या डोळ्यांत उमटलं.

'पोरांनो, माझी सर्वात दुर्दैवी पिढी. बापासमोर कधी डोळे वर करून मी बघितलं नाही. मी घरात असो की बाहेर, बाप समोर असो की नसो, बापाचा धाक कायम असायचा माझ्यावर. धोतर, टोपी आणि अक्कडबाज मिश्यावाला बाप उभ्या आयुष्यात

२-३ वेळाच रागावला असेल मला, पण रागावला तेव्हा चड्डी ओली झाली होती. या अशा बापाच्या ज्ञानावर मला कधीच शंका आली नाही....पण काळ बदलला. मी तुम्हाला मैत्रीच्या नात्यानं वाढवलं. पण तुमची पिढी ज्ञानानं सज्ञान न होता कायद्यानं सज्ञान झाली आणि मग तुम्ही, तुमच्या इंटरनेटीय माहितीवर माझ्या ज्ञानाची खिल्ली उडवू लागला. बापासमोर बोलायची हिंमत नव्हती आणि पोरांसमोर बोलायची सोय नाही अशी आमच्या पिढीची अवस्था. पोरांनो, खोट्या शिक्षणाची आणि इंटरनेटीय माहितीची झापडं काढा. जग त्याच्या पलीकडेसुद्धा आहे आणि अफाट आहे, अमर्याद आहे. माणूस आणि ज्ञान यांच्यामधलं अंतर फक्त आयुष्याच्या प्रवासाबरोबरच कमी कमी होत जातं हे सत्य नेहमी लक्षात ठेवा. देव तुम्हाला आणि पुढच्या सर्वच पिढ्यांना ही सद्बुद्धी देवो, ही माझी तुमच्यासाठीची शेवटची इच्छा रे माझ्या बाळांनो. आईची आणि स्वत:ची काळजी घ्या.'

'दिनूऽ दिनूऽ'

आर्त आक्रोश करत एक स्त्री वादळासारखी आत घुसली आणि दिनेशच्या शेजारी दोन्ही पाय मुडपून बसली. तिच्या आर्त हाकेनं दिनेशही क्षणभर दचकला आणि मग अनेक कल्लोळ डोळ्यांत घेऊन तिच्याकडे बघत राहिला. तिला जास्त कोणी ओळखणारं नव्हतंच. त्यामुळे जमलेल्या सर्वांचे प्रश्नार्थक डोळे तिला चिटकले.

'दिनू, अरे काय अवस्था झाली तुझी ही?' आणि ती ओक्साबोक्शी रडू लागली.

ती येणार याची दिनेशला खात्री होती आणि ती यावी ही त्याला आससुद्धा होती. तरीपण हिला कसं कळलं? हा प्रश्न त्याच्या मनात उमटला.

'दिनू, दिनू, दिनू....' ती आर्त रडत राहिली आणि रोखलेल्या कित्येक डोळ्यांतील प्रश्न तिच्याभोवती फिरत राहिले.

'अनिता....अनु....दिनू-अनु. तू येणार, नक्की येणार हे मला माहीत होतं. एवढीशी तू परकरी आणि मी अर्ध्या चड्डीतला पोर होतो तेव्हापासूनच आपलं सख्य....सख्य?....नाही. त्यापलीकडे काहीतरी. लग्नानंतरही आपण एकाच शहरात आलो. अधूनमधून भेटी होत राहिल्या. दोघांनाही काहीतरी बोलायचं होतं....खरं म्हणजे तू परकर-पोलक्यात आणि मी चड्डी-बनियनमध्ये असल्यापासूनच....पण नाही बोलता आलं....जाणवत मात्र राहिलं....

हमसे आया ना गया, तुमसे बुलाया ना गया

फासला प्यार में दोनोंसे मिटाया ना गया....

असं काहीसं आपलं झालं. अनु....आता रडू नको. सगळे डोळे बघ एका झटक्यात माझ्यावरून तुझ्यावर रोखले गेले आहेत. इतक्या वर्षांत आपल्याला कधी एकमेकांवरचं प्रेम व्यक्त करता आलं नाही, पण तुझ्या अशा हमसाहमशी रडण्यानं

भलत्याच कंड्या पिकतील. मग तू आणि निर्मला जिवंतपणी आणि मी मेल्यावरही रोजच मरत राहू.' मनातल्यामनांत त्यानं अनिताच्या डोक्यावरून हळुवार हात फिरवला. 'अनु, तुझा चेहरा ओंजळीत घेऊन तुझं कपाळ चुंबायची खूप इच्छा आहे माझी....ती हृदयातच घेऊन जातो...पुढच्या अनंताच्या प्रवासात सोबत म्हणून...' ती मुसमुसत बसून राहिली.

दिनेशनं बायकोकडे बघितलं. रडूनरडून तिची पार रया झाली होती. पदर चिंब भिजला होता.

'निर्मले, नांवात आणि तुझ्या जगण्यात मला कधीच अंतर जाणवलं नाही. तुझ्याबद्दल काय वाटतं ते मी नाहीच सांगू शकत, पण एक नक्की की पुनर्जन्म असलेच तर सातही जन्म मला पुन्हा पुन्हा तुझाच हात धरायला आवडेल....असंही तू वडाला भरमसाट फेऱ्या मारलेल्या असल्यामुळे माझी सुटका नाहीच म्हणा! हाहाहा! असो. मुलं गुणी आहेत. त्यांची काळजी घे. तुला मरेपर्यंत कोणा पुढे हात पसरावा लागणार नाही एवढी काळजी मी घेतली आहे....चल येतो आता. बाहेर कुजबूज फारच वाढली आहे. कावळ्यांना माझा पिंड खाण्याची जेवढी आस लागली नसेल तेवढी मी कधी राम म्हणतो याची आस या माझ्या सख्ख्या नातेवाईकांना लागली आहे. ते तरी काय करतील बिचारे? जागतिकीकरणाच्या स्पर्धेमुळे ते अगतिक आहेत. इतका वेळ ते थांबले यासाठी खरं म्हणजे त्यांना धन्यवादच द्यायला पाहिजे....करतो त्यांना मोकळं आणि मीही होतो मुक्त या अशा नात्यांतून....अरे हो, जाता जाता एक गंमत सांगतो, ज्या साठी हा संवाद सुरू झाला होता ती माझी 'अपूर्ण इच्छा' कोणती हे तर कोणीच विचारलं नाही. हा हा हा हा!....मी स्वत:च माझ्या अनेक शेवटच्या इच्छा व्यक्त करून टाकल्या. पण त्या कोणी ऐकल्याच नाहीत तर पूर्ण कोण करणार? हा हा हा!....तशीही माझी कोणतीच इच्छा मी अपूर्ण ठेवलीच नाही. उगाच मागे राहिलेल्यांना त्रास नको ना!....हा हा हा हा....पण निर्मले, तेवढी तू मऊ गोधडी खाली अंथरली असतीस तर बरं झालं असतं ग!!!....हा हा हा हा!!!....येतो....'

निर्मलेला त्यानं नजरेच्या मिठीत घेतलं. पापण्यांनीच तिला कुरवाळलं. त्याच्या दोन्ही डोळ्यांतून एक एक अश्रू ओघळला....बहुधा एक निर्मलेसाठी आणि एक.... अनितेसाठी ....मग त्यानं हलकेच डोळे मिटले आणि....आणि निर्मलेनं गगनभेदी हंबरडा फोडला....

...तत्क्षणी बाहेर ताटकळलेल्या लोकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि ते उत्साहानं पुढच्या तयारीला लागले!

**– मनीष पाटील**

भ्रमणध्वनी : ९९२००४२४४१

# । कविता ।



## नथ

नथ नाकात सरकवताना
तिने त्याच्याकडे पाहिलं.
छान दिसतेस!
नजरेत हसतच तो म्हणाला

तिचाही चेहरा खुलला

सर्वांच्या नजरा तिच्या नथीवरच
परंपरा आणि संस्कृती जपल्याचा आनंद
तिच्या चेहऱ्यावरून ओसंडला

ती वाकली नमस्कारासाठी तेव्हा जाणवला तिला
नथीचा जडपणा

पण पुन्हा एकदा नथीचा आकडा हळुवार सरळ करत
ती कामाला लागली

खरंतर अडथळाच होत होता नथीचा
खाता पिताना
बोलताना...

आजी मोत्यांची नथ सावरत दिवसभर
कष्ट उपसायची निमूटपणे.
आई सणावाराला दुखरं नाक सोसत
दिवस कधी संपेल याचीच वाट बघायची

तिने आरशात पाहिलं
हळूवारपणे नथीचा आकडा नाकातून बाहेर काढला
आणि ठेवून दिली नथ
कपाटातल्या बंद पेटीत
एक नकोसं ओझं मानेवरून उतरवून ठेवल्यासारखी.

**– कल्पना मलये**
भ्रमणध्वनी : ९६७३४३८२३९

## आधाराविना

मातीने कितीही सारवासारव केली
वरून एकसंधतेची
तरी खोलवर रुजलेल्या मुळांनी
ठेवलेल्या पोकळ खुणा–
उचकटून निघतांना, अलग होण्यासाठी
मिटवता येत नाहीत तिला, सहजासहजी–
माती एकटीच झुंजते, उन्हा पावसाशी
सावली अथवा खंबीर आधाराविना–

तिने पचवलेले असतात मशागतीच्या नावाखाली
असंख्य घाव, अनंत वेणा

**– दमयंती भोईर**
भ्रमणध्वनी : ८६५२८५११७७

## कविता

स्मशान सरकतच चाललंय वेगानं
शहराच्या दिशेनं
शहर कुढत चाललंय आतल्याआत
या आक्रमणानं
समजत नाहीए शहराला आता कसं
आवडावं तरी कसं
की सरळ त्याच्या हवालीच होत जावं
निमूट खालमानेनं!

काहीतरी करावंच लागेल शहरालाही
अगदीच तातडीनं
नाहीतर सांगावं लागेल इथं कधी होतं
एक शहर शरमेनं!

**– प्रमोद मनोहर कोपर्डे**
भ्रमणध्वनी : ९८९०१६६१२२

## जिव्हारी

कोण साद घाली मजला शिवारी?
हाक काळजातली लागे जिव्हारी

गाफील क्षणी डाव साधी शिकारी
चोरपावलांनी ये घेऊनी कट्यारी

सुखे जळी, खेळे मासोळी सागरी
पेटवी चूड कोण तो जलांतरी

पत्थरा, कसा रे न्याय तुझ्या दारी?
वण दुखरा, जखम ही जिव्हारी

**– अनुपमा निरंजन उजगरे**
भ्रमणध्वनी : ९९२०१०२०८९

## हाका

खूप लांबून ते एकमेकांना हाका मारायचे
असेल तिथून मोठ्याने ओ म्हणायचे
एकमेकांच्या मनातलं ओळखण्यात
पटाईत होते ते
हाकांचे भास होऊन म्हणायचे
हाक मारली का मला आत्ता
आणि मोठ्यानं हसत
आपापल्या कामात गुंतायचे

हाका मारता मारता कधीतरी
त्यांचे आवाज खोलखोल गेले पाण्यासारखे
स्वत:शी हातवारे करताना
ते हाका विसरले म्हणावं
की ओ देणं विसरले म्हणावं
काय झालं असेल
एकतर ते हाकांना माहीत असेल किंवा
ओ म्हणणाऱ्या आवाजांना
किंवा पलटलेल्या काळाला

**– कल्पना दुधाळ**
भ्रमणध्वनी : ९९२३६२७२१८

## जहाजांची दिवजं

समुद्रावर तरंगणारी
अगडबंब जहाजं
चमचमत्या लखलखत्या
दिव्यांची दिवजं

लोपल्यात समुद्राच्या
पाण्यावरच्या सराई
अन् आता सर्व शांत निवांत
वरचं शांत असलेलं आभाळही
तुकड्यात विखुरलंय नि झालंय अशांत

किती प्रदूषित हवा
नि कसलासा दुर्गंध भरलाय
वातावरणात
लोपलीय मिरासदारी
खाऱ्या आणि मतलई वाऱ्यांची
ह्या साऱ्यात


nautical miles चा प्रवासही आता
राहिला नाही सुकर
पाखरांसाठी
वा
जहाजांसाठी तरी

**– अंजली चितळे**
भ्रमणध्वनी : ९४२२०६३९०७

# पुस्तक परिचय

## राजीव जोशी

भ्रमणध्वनी : ९५९४०७४४५३




कोरोनोत्तर काळ सरतो-न-सरतो तोच जगभरात उद्‌भवलेल्या युद्धपरिस्थितीमुळे सर्वसामान्य तसंच जाहिरातदारांच्या आर्थिक अडचणींत मोठीच वाढ झालेली आहे. मराठी नियतकालिकांच्या प्रकाशनावर त्याचा परिणाम दिसून आलेला आहे. परिणामी अनेक मासिकं/ दिवाळी अंक बंद झाले आहेत. याला साहित्य परिषदांसारख्या संस्थाही अपवाद नाहीत. मराठवाडा साहित्य परिषदेचा प्रतिष्ठानचा अंक सांप्रत बंद आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा महाराष्ट्र साहित्य पत्रिका छापील स्वरूपात निघत नाही. गो. तु. पाटील, म. सु. पाटील, पुरुषोत्तम पाटील आदींनी सुरू केलेलं 'अनुष्टुभ' हे त्रैमासिक कधीच बंद पडलंय. वाचकांनी फ्री डाऊनलोडमुळे वाचनाचा पर्याय नेटवर स्वीकारला. वाचनाचं माध्यम बदललं असलं तरी छापील वाचनाचं महत्त्व दुर्लक्षित करता येत नाही, हे ओळखून काही माणसं व काही संस्था वार्षिक का होईना नियतकालिकं नेटानं चालवत आहेत. विदर्भ साहित्य संघाचं 'युगवाणी', तेलंगणा मराठी साहित्य परिषदेचे 'पंचधारा', सुखदेव ढाणके याचं 'सर्वधारा', बुलढाणा येथून प्रमोदकुमार अणेराव याचं 'तत्रैव' थोडफार ही नियतकालिकं अस्तित्व टिकवून आहेत हा त्यातल्या त्यात दिलासा.

**चैत्रेय वासंतिक**

प्रा. नरेंद्र पाठक आणि सौ. दया पाठक हे दाम्पत्य 'चैत्रेय' हा वासंतिक अंक गेली एकवीस वर्षं प्रसिद्ध करत आहेत. कोरोनाकाळातही तो प्रकाशित झाला, अगदी घरच्या घरी. नियतकालिकात वासंतिक अंक ही संकल्पना विरळाच. पाठक कुटुंबीय ती सातत्यानं एकहाती राबवत आहे. चैत्रेय व्यावसायिक किंवा निखळ मनोरंजनाचा अंक नाही तर कथा, कविता अशा ललित साहित्याबरोबर काही विचार वाचकांसमोर

मांडण्याचा प्रयत्न असतो. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त अनेक महत्त्वाचे लेख वैचारिक खाद्य देणारे आहेत. साहित्य राष्ट्रविकासाचा आधार कसा आहे हे सांगणारा प्रभाकर सालेगावकर यांचा महत्त्वाचा लेख आहे. वाचनसंकृती राष्ट्रविकासाचा मूलभूत आधार आहे ही संकल्पना मांडताना लेखक वाचन आणि संस्कृती या दोन भिन्न संकल्पना मांडताना सांगतो, की केवळ पुस्तकांची निर्मिती, ग्रंथालयांची निर्मिती, पुस्तकांची विक्री वाढली म्हणजे वाचन वाढलं असं होत नाही, संस्कृती तर मग दूरच. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाला आत्मनिर्भरतेने कशी झळाळी आलेली आहे याचा आढावा अरुण करमरकर यांनी घेतला आहे. 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवी कुंजविहारी यांच्या कवितेवरील किरण डोंगरदिवे यांचा लेख अतिशय भावपूर्ण आहे. या कवितेची लेखनप्रेरणा आणि कवितेनं फासावर गेलेल्या शहिदांना, त्यांच्या माता-पित्यांना, पत्नी व मुलांना कसा भावनिक आधार दिला, हे हृदय स्पर्शून जातं. अंकात सागर कुलकर्णी, डॉ. श्रीकृष्ण जोशी, गेनू शिंदे, सुभाष सुंठणकर आदींच्या कथा आहेत, सुजाता राऊत, रश्मी कशेळकर, अमेय चितळे, रविप्रकाश कुलकर्णी यांचे लेख आहेत आणि अर्थात कविता विभाग नामवंत कवींच्या कवितांनी बहरलेला आहे. अनेक नामवंत साहित्यिकांच्या सह्या असलेलं मुखपृष्ठ देखणं झालंय. अंकात डॉ. नरेंद्र पाठक यांची पुस्तकांवर अप्रतिम कविता आहे. 'तुम्ही पार बुडून गेलेले असता, तुमच्या फसव्या आभासी विश्वात, हे पाहून पुस्तकं, पुन्हा रडतात, व्यथित होतात, तुमच्याच काळजीनं, चिंतेनं' असा महत्त्वाचा विचार ही कविता देते.

**चैत्रेय वासंतिक**

संपादक : डॉ. नरेंद्र पाठक


पृष्ठे : १२८, मूल्य : १०० रुपये.

संपर्क बी-५०१, प्रेस्टीजपार्क, गणेशवाडी,

ठाणे (प) ४००६०१

**आशय परिवाराची दशकपूर्ती**

२३ एप्रिल हा जागतिक ग्रंथदिन आणि लेखनहक्कदिन. लेखन-वाचन या निरंतर चालणाऱ्या सृजनशील प्रक्रिया आहेत. ग्रंथकर्त्या लेखकांविषयी कृतज्ञता म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्याला औचित्य आहे ते श्रेष्ठ जागतिक नाटककार विल्यम शेक्सपीयर यांच्या जन्मदिवसाचं. पुस्तकांच्या लेखनाचा आणि निर्मितीचा जागतिक इतिहास प्रेरणादायक आहे. आज एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकातले आपण वाचक यासाठी भाग्यवान आहोत की जगभरातल्या विविध भाषांमधील साहित्य




अनुवादरूपानं आपल्यापर्यंत पोहोचतं आहे. जगातील भिन्न भिन्न भाषा, संस्कृती, सामाजिक-राजकीय परिस्थिती आणि मानसिकता साहित्याच्या विविध स्वरूपांत आपल्या भाषेत येणं ही मोठीच क्रांती. लेखन हा अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा उद्गार! म्हणूनच त्या सजग जाणिवेतून लिहिली गेलेली पुस्तकं आपल्यावर प्रभाव टाकतात. आपली जीवनवाट उजळतात. आपल्याला प्रगल्भ करतात. जगण्याच्या पसाऱ्यात माणसाला माणूस म्हणून उन्नत करणाऱ्या सर्वच लेखकांबद्दल आणि ग्रंथचळवळीतील कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस.

सोलापुरातील नीतिन वैद्य या ग्रंथवेड्या वाचक-लेखक मित्राच्या वैशिष्ट्यपूर्ण चळवळीची दशकपूर्ती या ग्रंथदिनी होते आहे. या सातत्यपूर्ण उत्साही धडपडीबद्दल नीतिन वैद्य या ग्रंथवेड्या वाचक-लेखक मित्राचं कौतुक करावं तेवढं थोडे. जयंत राळेरासकर, पुरुषोत्तम नगरकर आणि चित्रकार शिरीष घाटे यांच्या सहकार्यानं नीतिन वैद्य यांनी हा अभिनव उपक्रम सुरू केला तेव्हाच त्याचं वेगळेपण महाराष्ट्रातील सुजाण रसिक वाचकमनांवर ठसठशीत उमटलं होतं. त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी ग्रंथदिनाची ही नाममुद्रा आशय परिवाराची अभिन्न ओळख बनली. सुरुवातीला कार्ड, फोल्डर या लक्षवेधक स्वरूपात आशयनं ग्रंथदिन आणि लेखनहक्कदिनाविषयी एक प्रकारे जागृतीच केली. पुढे त्याला छोट्या पुस्तिकेचं किंवा मासिक आकाराचं रूप देताना अनेक गंभीर विषय हाताळले गेले. पहिला अंक प्रकाशित झाला २०१२ साली. ज्येष्ठ कादंबरीकार, कवी, समीक्षक प्रा. त्र्यं.वि. सरदेशमुख यांची 'कविता चंद्रकेतूची' हे पहिल्या अंकाचं आकर्षण होतं. नव्या आख्यानसदृश स्वरूपात ते प्रकाशित करण्यात आलं होतं.

कोरोनामुळे २०२० साली पडलेला खंड वगळता, यंदा २०२२ साली दशकपूर्ती होताना आणखी एक योग जुळून आला तो म्हणजे सरदेशमुखसरांच्या 'बखर एका राजाची' या कादंबरीला यंदा पन्नास वर्षं पूर्ण होत आहेत. या कादंबरीचा सुवर्णमहोत्सव हा विषय 'आशय'च्या ग्रंथदिन अंकाचं वैशिष्ट्य ठरणार हे ओघानं आलंच; नीतिन वैद्य यांनी कल्पकतेने ज्येष्ठ अनुवादक, समीक्षक प्रा. निशिकांत ठकार यांनी 'बखर एका राजाची' या कादंबरीचा संक्षिप्त हिंदी अनुवाद या अंकात दिलाय. ठकारसरांनी हिंदी-मराठीत बांधलेला पूल समस्त साहित्यरसिकांची मनं सुखावणारा आहे. ठकारसरांचं हे कार्य विलक्षण वेधक आणि अनमोल आहे. त्याची जाण ठेवत


आपले जणू वाङ्‌मयीन दैवतच असलेल्या सरदेशमुखसरांविषयी नीतिन वैद्य यांनी यंदाच्या या अंकात बखरीचा सुवर्णमहोत्सव असा आगळ्या रीतीनं साजरा केला आहे.

याशिवाय, बखर प्रकाशित झाल्यानंतर सरदेशमुखसरांना वाचक, लेखक, समीक्षकांची शेकडो पत्रं आली. त्यातील निवडक पत्रं या अंकाच्या शेवटी प्रकाशित करण्याचं औचित्य वाखाणण्याजोगे. ही केवळ स्तुतीपत्रं नाहीत. त्यांत सूचना, टीका, नापसंती आणि विलक्षण भारावलेपणानं केलेलं सुजाण कौतुकही आहे. सुरुवातीला संवाद साधताना नीतिन वैद्य यांनी म्हटलं आहे, की पुस्तकांबद्दलची कृतज्ञता समधर्मियांमध्ये वाटून घ्यावी यासाठी हा उपक्रम सुरू केला. यानिमित्तानं सरदेशमुखसर आणि त्यांचे अप्रकाशित साहित्य यावर चार अंक प्रकाशित झाले. वाचनप्रक्रियेतील सृजनासंबंधी डॉ. आनंद जोशी यांच्या लेखनावर दोन अंक. त्यातील 'अक्षर पाविजे निर्धार' हा अंक तर कन्नडमध्ये अनुवादित झाला असून पुस्तकरूपानंही प्रकाशित झाला आहे. यंदाच्या अंकाचं रुपडंही गोमटं आहे. मुखपृष्ठावर बखरच्या आवृत्त्यांची छोटी मुखपृष्ठं आणि शिरीष घाटे यांची कलात्मक मांडणी असलेली 'पन्नाशी बखरची' ही अक्षरं लक्ष वेधून घेतात. मलपृष्ठावर सौमित्र यांची पुस्तकांविषयीची 'वाचणाऱ्याने' ही कविता मुळातूनच वाचण्यासारखी. ही कविता कवी सतीश काळसेकर यांच्या स्मरणार्थ लिहिलेली आहे. काळसेकर यांच्याकडे त्यांची अफाट ग्रंथसंपदा होती. ही एक पिढी होती. यातले अनेक आज ग्रंथालयांमध्ये आपल्या घरातील पुस्तकं आणून टाकतात. आयुष्यभर वाचनाचा ध्यास घेऊन पुस्तकं जमा करणारी पिढी निघून चालली आहे. पुस्तकं आहेत पण वाचणारे नाहीत. पुस्तकं म्हणतात, तेव्हा आता आम्हालाही, रचून त्याच्यासोबत लाकडावर, एकत्रच भडाग्नी देऊन, मिसळून जाऊ द्यावं दोघांना, वर जाताना एकमेकात धूर होऊन'.

नीतिन वैद्य यांचा आशय परिवार पदरमोड करून हे अंक काढतो. ना वर्गणी, ना शुल्क, ना देणगी. अपार प्रेमाचं मूल्य आणि मोल मात्र या धडपडीत आहे.

**पन्नाशी बखरची**
आशय परिवार
संपादन : नितीन वैद्य,
पृष्ठे : ५२
१४, संयुक्त सहनिवास, २०८ दक्षिण कसबा,
सोलापूर ४१३००७

**वेदनेचा तीव्र झंकार**




माणसाचं मन एक मोठं तळघर आहे. या तळघरात माणसांच्या तीव्र भावना, सुखद-दु:खद आठवणी, चांगल्या-वाईट अनुभवांच्या सावल्या, स्वप्नं, आशा-आकांक्षा, एकटेपण, भीती, दहशद, रहस्य, विचार-विकार, वासना, आत्मनियंत्रण, निषिद्धता सारं काही ठासून एकमेकांत मिसळून गेलेलं असतं. एक मोठा कल्लोळ, घुसळण चाललेली असते, वेगवेगळ्या मार्गांनी आतलं बाहेर येऊ घातलेलं कधी अमृत असतं कधी गळ्यात साठलेलं विष. तळघरातल्या कल्लोळातून कविता बाहेर येते, बाह्यावकाशाशी नातं जोडते, बाहेरून आत आणि आतून बाहेर असा दुहेरी मार्ग असला तरी ती एका अर्थानं खाजगी, वैयक्तिक असते. व्यक्तिगततेपासून सुरू होऊन सार्वत्रिक होणं हा कवितेचा धर्म आहे. सध्या समकालातील कवितेत सामाजिक विषयाचे विविध पदर दिसून येत असले तरी आत्मपर कविता आंतरिकतेशी निकटचं नातं सांगणारी असते. आत्मपर कविता तळघरातल्या चिंतनाला अभिव्यक्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करते. आपल्या खाजगी अनुभवांतून सार्वकालिक सत्याचा, मानवी मूल्यांचा शोध कवी घेत असतो, तेही आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या खास शैलीत. अशीच आंतरिक आत्मपरतेनं व्यक्त करणारी कवी भाऊ विशे यांची कविता 'वेदनेची वीणा' या सृजनसंवाद प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या संग्रहात दिसून येते.

ऐंशीच्या दशकापासून भाऊ विशे मराठी कवितेतलं महत्त्वाचं नावं आहे. १९८४ मध्ये त्यांचा 'निर्वासित' नावाचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर २००४मध्ये 'कंदील आणि काळोख' प्रकाशित झाला. अलीकडेच डिसेंबर २०२१मध्ये त्यांचा 'वेदनेची वीणा' हा कवितासंग्रह 'सृजनसंवाद प्रकाशना'च्या वतीनं प्रकाशित झाला. तीनही संग्रहांना प्रकाशक वेगवेगळे लाभले, मात्र मुंबईच्या छायेत असूनही निसर्गरम्य अशा वाशिंदसारख्या खेड्यात राहणाऱ्या भाऊच्या कवितेची बलस्थानं ओळखून प्रा. अशोक बागवे यांनी त्यांच्या कवितेची निर्व्याज पाठराखण केली. सत्तर-ऐंशीच्या दशकांत वाशिंद म्हणजे मुंबईच्या छायेत वसलेलं एक खेड होतं, भाऊ तेव्हा झोपडी वजा घरात राहत होता. 'झोपडी' ही कविता जगण्याविषयीचं भाष्य आहे. तो म्हणतो, 'तू पाहिला नाहीस झोपडीतला काळोख, रिकामी गाडगी-मडकी, उंदरासारखी खुडबुडणारी आणि डोळ्यांत मरण घेऊन जगणारी माणसं.' जीवनातल्या अनेक चढ-उतारांवर दमछाक होऊनही शहराच्या भूलभुलय्याला न भुलता भाऊ निसर्गरम्य गावातच राहिला. त्या जागी आता भाऊचा बंगला असला तरी गावानं गावाचं गावपण आणि गावाला

साहित्यिक ओळख देणाऱ्या भाऊनं आपलं कवितापण जपलंय याचं कारण रानात वावरणाऱ्या झाडांची आणि पाखरांची त्याला मिळत गेलेली साथ. 'देवाच्या डोळ्यामधला, पाऊस उतरतो भाळी/ बिनचूक अपुल्या भोवती, मृत्यूच वाजवी टाळी' (पाऊस उतरतो भाळी) या 'काळोख आणि कंदील'मधल्या कवितेतला नियतीचा गूढ धागा भाऊच्या 'वेदनेची वीणा' या संग्रहातल्या कवितेतून पार्श्वसंगीतासारखा झंकारतो आणि त्यातून उमटणारी स्पंदन वाचकाच्या हृदयाला आरपार छेडतात.

'वेदनेची वीणा'मधील बहुतांश कविता पत्नीच्या चिरविरहाचं उत्कट भावदर्शन करतात. आयुष्याचा तुरुंग होतो म्हणजे काय होतं, 'प्रिये, तुला काय सांगू? जिवाभावाचं आयुष्यातून कुणी निघून जातं, तेव्हा काय होतं, प्रिये, तुला काय सांगू?' 'काय तुला सांगू' या कवितेत कवी पुढे म्हणतो, 'रोज एक सूर्य विझत जातो, डोळ्यांना लागते गळती, उरावर पडतो धोंडा, म्हणजे काय होतं, प्रिये, तुला काय सांगू?' या केवळ आठवणी नाहीत किंवा स्मृती, त्या आहेत उत्कट विराण्या, विरहाच्या दवात भिजलेल्या. भाऊच्या कवितेतलं विरहाचं दुःख वाचताना कवी अनिल आठवतात– 'दहिवरल्या प्रहरातून वाट पाहते पहाट, बहर गळे दरवळला कसा तुझ्याविना' किंवा 'आधारच तुझा पायाखालचा निघून गेला कसा एकाकी, ज्यावर आहे मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी. जिच्या सहवासात आयुष्याची तीसेक वर्षं काढली तिचा फिरून फिरून आठव ही वेदनेची वीण आहे. जिचा सहवासात कविता फुलली तिची सोबत अचानक तुटल्यानं पुन्हा कविता लिहायच्या नाहीत अशा निर्धारानं कवी झोपी जातो तर 'माझ्या स्वप्नात रात्रभर तूच, माझ्या कवितांची वही घट्ट उराशी धरून, माझ्या उशाशी बसून मला कवितेचा अर्थ समजावून देत' यात साहचर्यातलं घट्ट बाँडिंग सूचित होतं. जगातून देहरूपानं अस्तंगत झालेल्या प्रियतमेची कवीला भासातून प्रतीति होत राहते आणि त्यातली निरर्थकता जाणूनही धरून ठेवण्याचा प्रयत्न असफल होतो तेव्हा संदर्भहीन ओळीसारखी जाग झाल्यावर ती आणि कवितेची वही दोघंही नसतात. कवी म्हणतो, 'तेव्हापासून मी समास सोडून लिहायचे ठरवलं आहे, निरर्थक आयुष्याचं उरलेलं पान.' भाऊच्या कवितात विरहाने आलेला एकाकीपणा आहेच, विलक्षण आकांत आहे, आता तरी ये, कुठे? संग्रहातील 'निरोप', 'संपूर्ण कविता', 'जेमतेम' अशा अनेक कविता म्हणजे विरहातून आलेला एकाकीपणा आणि एकाकीपणातून तिचा घेतलेला शोध, मात्र, 'विळखे', 'अखेरचं झाड', 'विसर्जित' अशा काही कवितांत प्रियेच्या ध्यासाने कवीच्या मनाची तडफड, तगमग. असहाय्यता दिसून येते. 'विसर्जित' या कवितेतील 'गात्रागात्रात येत चाललेलं शैथिल्य – म्हणजे डोळ्यांना तू दिसत नाहीस, हातांना होत नाही तुझा स्पर्श, ओठांवर तुझं नावं न येणं, तुझ्या आठवणींनी हृदयाचे ठोके न वाढणं – यातून पायरीपायरीनं विसर्जित होत चाललोय' ही भाषा निर्वाणाची असली तरी त्याला येत असलेला तिचा भुई चम्पकी दरवळाचा आठव मनाचा टवटवीतपणा, आस्वादाची


रोमँटिक वृत्ती सूचित करतात.

विरह कवितात मागे वळून केलेलं स्मृतीचिंतन असलं तरी विराहातूनच प्रेमाची उत्कटताही कळून येते. देहात नसली तरी ती अवती भोवती असल्याची जाणीव जीवनाला उभारी देणारी असते. सांग' या कवितेत, डोळ्यातून डोळ्यात, मनातून मिठीत, ओठातून दिठीत बिलगत राहतेस, हातातून हातात, चालतांना रस्त्यात सोबत असतेस' यातूनच कवी स्वता:च समाधान करून घेत विचारतो मला सांग सखये, तू कुठे नसतेस?' या अशा प्रीतीच्या उत्कट कविता मोजक्याच असल्या तरी वास्तवाच्या भीषण जाणीवेतून आलेलं नैराश्य शब्दाशब्दातून जाणवत राहत. विळखे' या कवितेत कवी म्हणतो अदृश्य हातांचे विळखे, पडताहेत माझ्याभोवती, वादळे रक्तातच सुरु झालेली आहेत'. तिच्या जाण्यानं आणि तिच्या नसण्यानं आयुष्याची अठ्ठावीस युगे (सहवासाची अठ्ठावीस वर्षे अभिप्रेत) नासाडी होऊन बसली आहेत, मनात रुजलेल्या बागा बेचिराख झालेल्या आहेत, पाश आवळले आहेत दाही दिशांनी, अखेरच्या भोवऱ्याकडे खेचला जातोय असं म्हणत असतांना कवी म्हणतो शेवटी ओठावर तुझे नावं असू दे आणि डोळ्यात तुझे रूप, मग पक्षी उडाला काय अन् बुडाला काय'. यात आत्यंतिक प्रीतीधर्म आहे.

वेदनेची वीणा' मधील कविता या प्रामुख्याने विरहकविता आहेत. घर हे प्रतिक घेवून घर' शीर्षकाची कविता बांधेसूद, आशयघन आणि घोटीव शब्दकळा घेवून उतरली आहे. जेव्हा हे घर.. तेव्हा हे घर' अशा मधल्या असण्या-नसण्यातून कवी घराच्या अवस्था अचूक शब्दबद्ध करतो. संग्रहातील बहुतेक कविता विरहकविता असल्या तरी निसर्गकविता हा भाऊचा खास बाज आहे, फुलवणारा पाऊस, मोर, पावसाचे गाणे या कविता सुरेख निसर्गचित्र रेखाटतात. आयुष्य'ही कविता मित्राविषयी आहे, पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्य बर्बाद करणारा मित्र आणि आयुष्य बर्बाद का झालं या विवंचनेत असणारा निवेदक.. हा संवाद चिंतनशील झालाय. कोल्हेकुई, रानाचे मनोगत या सारख्या सामाजिक जाणीवेच्या कविता विचारशील आहेत. मात्र, विरहकविता असो, निसर्ग कविता असो वा सामाजिक, भाऊच्या विणेतून प्रामुख्याने झंकारतेय वेदनेची वीणा..

**वेदनेची वीणा**
कवी : भाऊ विशे
सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे
मुखपृष्ठ : अश्विनी खटावकर
मूल्य : रु.१७५

**भारताच्या प्राचीन वैभवाचा धांडोळा**




ताजमहाल, ज्ञानवापी, कुतुबमिनार अशा अनेक ऐतिहासिक वास्तूंची, ठिकाणांची नावं आजकाल या ना त्या कारणांमुळे सतत कानावर पडू लागलेली आहेत आणि त्याबाबतचा इतिहास आपण जाणून घेतला नाही तर वर्तनामानापासून आपण अलगथलग पडत जातो. उदाहरणार्थ, जागतिक आश्चर्य म्हणून आपल्याला ताजमहाल माहीत असतो, पण त्यामागे दडलेल्या अनेक रहस्यांपासून आपण वंचित राहतो, कारण त्याबद्दलची माहिती जाणून घ्यायचा आपण कधी प्रयत्न केलेला नसतो. पु.ना. ओक यांनी अनेक वर्षं संशोधन करून 'द ताजमहाल इज अ टेम्पल पॅलेस' या इंग्रजी पुस्तकाचा केलेला 'ताजमहाल नव्हे तेजोमहाल' मराठी अनुवाद प्रसिद्ध आहे. प्राचीन भारताचा इतिहास वैभवसंपन्न आहे इतकेच आपणास माहीत आहे, त्यातील चांगल्या घटनांपासून स्फूर्ती घेऊन प्राचीन वैभव मिळवण्यासाठी इतिहास वाचला पाहिजे या तळमळीतून 'सोन्याचा धूर' हे नितीन लाळे लिखित ३६४ पानांचं पुस्तक पुण्याच्या विद्या-वैभव प्रकाशनाकडून प्रसिद्ध केलेलं आहे. आपल्या देशात पूर्वी सोन्याचा धूर निघत होता असं आपण आपल्या बुजुर्गांकडून ऐकलंय. नीट विचार केला तर लक्षात येतं की वैभव म्हणजे सोनं-नाणं, धनदौलत नाही तर तत्त्वज्ञान, उच्च आचार-विचार प्रगत तंत्रज्ञान, सुंदर कला. कापसाचा शोध घेताना आपल्या इथेच, एडनवाला रोडवर असलेल्या कापूस तंत्रज्ञान मध्यवर्ती संशोधनकेंद्रात मोहन-जो-दरो येथील उत्खननात सापडलेला कापूस प्राचीन भारताची, सिंधू संस्कृतीची जगाला देणगी आहे हे पाहून माथा उन्नत झाला. ब्रिटिश काळात ढाक्याची मलमल युरोपातील श्रीमंताच्या पसंतीस उतरलेली होती. प्राचीन भारताचा इतिहास सुंदर आहे. सोन्याचा धूर निघू शकेल असं सात्त्विक वैभव आपल्याकडे होतं आणि असंख्य पुराव्यांच्या आधारे नितीन लाळे यांनी आपल्या पुस्तकातून मांडलंय.

व्यापारी जहाजावर रेडिओ ऑफिसर-पर्सर म्हणून कार्यरत असताना श्री. लाळे देशोदेशी हिंडले. या प्रगत देशातील वैभवानं म्हणजे तिथले रस्ते, सुव्यस्था, श्रीमंती, स्वच्छता आपल्या देशाचा विचार त्यांच्या मनात सुरू झाला आणि व्यापारी जहाजावरच्या फुरसतीत ते वाचत गेले. आपला इतिहास, संस्कृती, विज्ञान अशा विविध विषयांवर वाचत असताना त्यांच्या लक्षात आलं की कधी काळी आपला भारतही असाच श्रीमंत होता. व्यापार आणि शिक्षणासाठी जगभरातून भारतात रीघ

लागली होती, समुद्रमार्गानं प्राचीन भारतात जहाजं भरून संपत्ती भारतात आली. मात्र गेल्या पाच हजार वर्षांत आपल्या पूर्वजांनी आक्रमणं, अत्याचार, अपमान, पराभव अशी अनेक दु:खं पचवली, पण भारताचा संपूर्ण विनाश कधीच झाला नाही याचं कारण या मातीतल्या, धर्मातल्या अवतार कल्पना, पुराणकथा, मूर्ती, चिन्हं, प्रतीकं यांमध्ये धार्मिक ऐक्य कायम ठेवण्याच्या सुंदर कल्पना होत्या. म्हणूनच भारताची धार्मिक आणि व्यापारी अधिसत्ता दीड हजार वर्षं जगावर होती.

या पुस्तकात एकूण अठरा प्रकरणं आहेत. 'उदयास्त सिंधू संस्कृतीचा' या पहिल्याच प्रकरणात लेखक इ.स.पू.३००० पासूनच्या प्राचीन भारताच्या तत्कालीन जीवनाचा आलेख वाचकांसमोर मांडतात. तंत्रज्ञान, धातू-रसायनशास्त्र, गणित, नृत्य, तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र, शिल्पकला, कृषी, कामशास्त्र, गायन, स्थापत्य, नगरजलव्यवस्था, नौकानयन, शिक्षण अशा अनेक विषयावर प्राचीन भारताच्या प्रगतीच्या खुणा दाखवतात. सिंधूसंस्कृतीपासून मुस्लीम सत्तेपर्यंत म्हणजे इ.स.पू.३००० ते इ.स.११०० काळात भारतीय जहाजं रोमपासून चीनपर्यंत प्रवासी व मालाची वाहतूक करत असत. जहाजं बांधण्यात आपले कारागीर अती कुशल होते, त्यांनी बांधलेली देवदार, सागाची जहाजं मजबूत व समतोल होती. आधुनिक शास्त्रीय संशोधनानुसार सिंधू संस्कृतीच्या प्राथमिक जडणघडणीची सुरुवात इ.स.पू.७००० मध्ये रावी संस्कृतीपासून झाली असं मानलं जातं. मात्र, सिंधू संस्कृतीची सुरुवात इ.स.पू.४५०० मध्ये टोगाओ संस्कृतीपासून हळूहळू झाली असं मत ते मांडतात. इ.स.पू.२६०० ते इ.स.पू.२००० हा सहाशे वर्षाचा कालावधी तिचा सुवर्णकाळ होता आणि इ.स.पू.१६०० मध्ये सिंधू संस्कृतीचा पूर्ण अस्त झाला.

वायव्य भारत, राजस्थान, हरियाणा, गुजरात याशिवाय पर्शियन गल्फ, इराक, इराणमध्ये सिंधू अवशेष सापडले. कुल्ली (बलुचिस्तान), मोहन्जोदारो (सिंध), हडप्पा (पंजाब), राखीगढी (हरियाणा), कालीबंगन (राजस्थान), धोलावीरा (कच्छ), लोथल (सौराष्ट्र) ही काही प्रमुख शहरं त्याकाळी होती. त्या काळातली समाजरचना, राहणीमान, घरं, गोदामं, पिण्याच्या व सांडपाण्याच्या व्यवस्थेबाबत विस्तृत माहिती पुस्तकात आलेली आहे. सिंधुलिपी वाचता आलेली नसल्यामुळे सिंधुचिन्हांचा बोध झालेला नाही असं लेखकाने नमूद केलं असलं तरी गेल्या शतकभर अभ्यासक डीकोडिंगबाबत कार्यरत होते, किंबहुना, भाषेचं ध्वनिसंलग्न चिन्हीकरण. चिन्हांचं चित्रीकरण, चित्रित चिन्हांतून संदेशवहन आणि चित्रित चिन्हांचं ध्वनिसंलग्न भाषिक रूपांतर अशा विविध पद्धतींचा वापर करून सिंधुकालीन, सुमेरिअन, असिरीयन, एलाम लिपीचिन्हांचा विस्तृत आढावा उपलब्ध असलेल्या जवळपास ९००० पुरालेखांच्या आधारे 'सिंधुकालीन लिपी आणि भारतीय भाषांचा इतिहास' या ग्रंथात

रवींद्र इंगळे चावरेकर यांनी तसेच 'मेलुहा सभ्यतेचा शोध' या ग्रंथांत नितीन भरत वाघ यांनी घेतलेला आहे.

वेद, उपनिषदं, अरण्यकं, दर्शनं ही प्राचीन भारताची अमूल्य विचारसंपत्ती. लेखकानं या काळातील विचारवैभवाचा विस्तृत आढावा तीन प्रकरणांत घेतलेला आहे. यात खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, विज्ञान, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, तत्कालीन कायदेशास्त्र यांचा समावेश आहे. आर्यभट्ट, वराहमिहीर, भास्कराचार्य, लीलावती आदि गणिततज्ज्ञापासून पतंजली, वनस्पतिशास्त्राचे आचार्य सुरपाल, कृषिशास्त्राचा पाया घालणारे पराशरमुनी, महान रसायनशास्त्रज्ञ नागार्जुन, भोगवादी विचार मांडणारे चार्वाक, सांख्यदर्शनाचे कर्ते महामुनी कपिल, वैद्यराज जीवक, पहिला प्लास्टिक सर्जन सुश्रूत, आयुर्वेदाचा पाया घालणारे चरक, संस्कृत व्याकरणाचा पाया घालणारे पाणिनी, यास्क या सर्वांबाबत विस्तृत माहिती ओघवत्या भाषेत लेखकानं दिलेली आहे, त्यामुळेच वाचतांना कुठेही जडत्व येत नाही. प्राचीन भारतातील शिक्षणपद्धती, व्यापार, उद्योगधंदे, शिल्पकला याविषयी माहिती वाचकाला समृद्ध करून जाते.

अलीकडे इंडियन डायस्फोरा हा शब्द आपल्या वाचनात, ऐकण्यात सतत येत असतो. याचा अर्थ भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांचा भारत. शिक्षण, नोकरी आदीसाठी आपल्या माहितीतील, नात्या-गोत्यातील अनेक मंडळी अमेरिका, युरोप, आफ्रिका आदी देशांमध्ये जवळपास केवळ स्थायिक झालेली आहेत असं नाही तर आपली संस्कृतीही घेऊन गेलेली आहेत. सिंधुकाळापासून हा सिलसिला चालू आहे. व्यापार, धर्मप्रसार, राजसत्तेच्या निमित्तानं रोम, ग्रीस, मध्य-आग्नेय आशिया. चीन-जपान आदी देशांत लाखो भारतीय गेले, स्थानिक स्त्रियांच्या संबंधातून भारतीय वंशज जन्मले. स्थायिक भारतीयांनी केवळ धार्मिक मठमंदिरंच उभारली नाहीत तर त्यांचा राजकीय-सांस्कृतिक सत्तेतही सहभाग वाढत आहे. अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस भारतीय वंशाच्या आहेत, ब्रिटनमध्ये भारतीय वंशाचे अनेक मंत्रिमंडळात आहेत. या देशांमध्ये स्थायिक भारतीयांनी अनेक मंदिरं उभारली आहेत, भारतीय सण मोठ्या संख्येनं साजरे केले जातात. श्री. लाळे यांनी 'वैभव बृहदभारताचे' या शीर्षकाच्या तीन प्रकरणांत म्यानमार, थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम, चीन, मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका या देशांमध्ये भारतीयांनी आपली धर्मसंस्कृती कशी पोचवली याचा रंजक आढावा घेतलेला आहे.

श्री. लाळे यांचा हा ग्रंथ इतिहासप्रेमींसाठी खजिना आहे. गतवैभवांच्या आठवणींमध्ये जगण्यापेक्षा वर्तमानात जगा असा अनाहूत सल्ला देणारे असतात. यावर लाळे म्हणतात, की आपल्या पूर्वजांमुळे, त्यांच्या शौर्यामुळे, कर्तृत्वामुळे या पायावर

आपण उभे आहोत. लाळे यांचा हा ग्रंथ एका अर्थानं डायजेस्ट आहे, माहिती संकलित केलेली आहे. मात्र असं करताना विस्कळीतपणा टाळायला हवा होता, त्याचबरोबर उद्‌धृत केलेल्या माहितीचे स्रोत, संदर्भ द्यायला हवे होते, त्यामुळे वाचकांना, अभ्यासकांना मूळ स्रोतापर्यंत जाणं शक्य झालं असतं.

**सोन्याचा धूर**

लेखक : नितीन लाळे

प्रकाशक : विद्या वैभव प्रकाशन

भुजबळ अपार्टमेंट, सिंहगड रोड

पुणे ४११०३१

मूल्य : रु. ४००/-

## वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती

'साहित्य' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते- विचार व साहित्यकला यांच्या सृजन-संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची 'साहित्य'ला गरज आहे - वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.

## पुरस्कार

प्रा. प्रतिभा सराफ यांच्या, 'उमलावे आतुनीच...' या कवितासंग्रहाला सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूरचा 'सृजनप्रतिभा - २०२२' वाङ्‌मयीन पुरस्कार तसेच मिठू मिठू... या बालकथासंग्रहासाठी 'कुंडल - कृष्णाई प्रतिष्ठान', कुमठे, ता. कोरेगाव जि. सातारा यांचा वाङ्‌मयीन पुरस्कार प्राप्त झाला आहे.

ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या, डॉ. अनुपमा उजगरे ह्यांच्या 'ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या' ह्या पुस्तकाला, वाङ्‌मयचर्चा मंडळ, बेळगाव ह्या संस्थेचा पुरस्कार लाभला आहे. ह्याच पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या ११६व्या वर्धापनदिनी, श्रीवत्स प्रकाशनचा 'विपुलश्री पुरस्कार' मा. रावसाहेब कसबे ह्यांच्या अध्यक्षतेखाली, अशोक बाजपेयी ह्यांच्या हस्ते देण्यात आला.

## एकनाथ आव्हाड यांच्या पुस्तकांना राज्यस्तरीय पुरस्कार

१) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीनं देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'वि.वि. बोकील स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार' एकनाथ आव्हाड यांच्या, दिलीपराज प्रकाशनानं प्रकाशित केलेल्या 'शब्दांची नवलाई' या बालकवितासंग्रहास सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक अशोक वाजपेयी यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे होते.

२) साहित्यकणा फांऊडेशन, नाशिक यांच्या वतीनं 'शब्दांची नवलाई' या बालकवितासंग्रहास 'डॉ. राहुल पाटील स्मृती राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार' नुकताच आव्हाड यांना मिळाला आहे.

३) कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीनं मागील तीन वर्षांचे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. त्यात सन २०१८-२०१९ मधील देण्यात येणारा 'प्र.श्री. नेरुरकर उत्कृष्ट बालसाहित्याचा राज्यस्तरीय पुरस्कार' एकनाथ आव्हाड यांच्या 'व्यास क्रिएशन्स'नं प्रकाशित केलेल्या 'मिसाईल मॅन : डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम (भाग १ ते ४) या चरित्र गोष्टींच्या पुस्तकासाठी; तसंच सन २०२० ते २०२१ मधील 'प्र.श्री. नेरुरकर उत्कृष्ट बालसाहित्याचा राज्यस्तरीय पुरस्कार' आव्हाड यांच्या 'शब्दांची नवलाई' या बालकविता-संग्रहासाठी जाहीर झाले आहेत.

४) अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा, बालसाहित्यातील प्रथम क्रमाकांचा 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार' एकनाथ आव्हाड यांच्या, दिलीपराज प्रकाशनानं प्रकाशित केलेल्या 'छंद देई आनंद' बालकवितासंग्रहास नुकताच जाहीर झाला आहे.

## 'साहित्य' त्रैमासिकासाठी साहित्य पाठवण्याबाबत सूचना

- 'साहित्य'करता लेखन पाठवताना, ते टंकलिखित अथवा संगणकाद्वारे मुद्रित केलेले असावे. लिखित स्वरूपात असल्यास, सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले असावे.
- लेखन narayanlale@gmail.com अथवा sahityasangha@gmail.com यावर किंवा संपादकीय पत्त्यावर पाठवावे.
- सृजनात्मक, संशोधनात्मक लेखनाचे तसेच दर्जेदार, वैचारिक, ललित लेखनाचे स्वागत आहे.

# कार्यवृत्तांत – साहित्यशाखा

साहित्य संघाच्या साहित्य शाखेतर्फे अलीकडे तीन ऑनलाइन आणि एक ऑफलाइन असे चार कार्यक्रम झाले.

१. पुस्तकावर बोलू काही हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात कथाकार प्रणव सखदेव यांनी जेरेड डायमंड यांच्या 'गन्स, जर्म्स ॲण्ड स्टील' या पुस्तकाचा आढावा घेतला. त्यात इतिहास, जीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र आणि भाषाशास्त्र याचं नव्या संकल्पनेद्वारे विश्लेषण केले आहे. रुचिता राणे यांनी रिचर्ड बाख लिखित 'जोनाथन लिविंग्स्टन सीगल' या पुस्तकाची माहिती दिली. कवी आदित्य दवणे यांनी 'एम टी आयवा मारू' या कादंबरीविषयी आपली मते मांडली तर आर्यांना बिस्वास हिने 'ईकी गाय' या मूळ जपानी पुस्तकाचा इंग्रजीत केलेल्या अनुवादात्मक पुस्तकाचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा बिस्वास यांनी केले.

२. बालभारती पाठ्यपुस्तकातील कवींचे कविसंमेलन स्वामी मुक्तानंद हायस्कूलच्या सहकार्याने झाले. या कविसंमेलनात ज्येष्ठ कवयित्री आसावरी काकडे यांच्यासह कैलास दौंड, एकनाथ आव्हाड, तुकाराम धांडे, अशोक कोळी, सुनंदा भावसार, शंकर कसबे यांनी पाठ्यपुस्तकातील आपल्या कविता सादर केल्या. विद्यार्थिनी स्वानंदी शेंडकर हिने 'उगवतीचे रंग' या कवितेचे वाचन केले.

३. मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून साहित्य संघाने ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांचा 'साहित्य प्रवास' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये प्रा. मोना चिमोटे यांनी शांताबाईंच्या काव्यप्रवासावर भाष्य केले. लेखिका रेखा नार्वेकर यांनी शांताबाईंच्या काही आठवणी सांगितल्या तसेच शांताबाईंच्या काव्य–गीतलेखनाला मिळालेली प्रेरणा सांगितली. मुक्त पत्रकार शर्वरी जोशी यांनी बालगीते ते लावणी तसेच विविध प्रकारचे साहित्य निर्माण करणाऱ्या शांताबाई यावर आपले विचार मांडले. प्रा. प्रतिभा बिस्वास कार्यक्रमाच्या संयोजिका होत्या.

४. उदगीर येथे होणाऱ्या ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. भारत सासणे यांच्या सत्काराचा आणि मुलाखतीचा कार्यक्रम तिसऱ्या मजल्यावरील डॉ. बाळ भालेराव सभागृहात संपन्न झाला. प्रारंभी साहित्य शाखेचे कार्यवाह श्री. अशोक बेंडखळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी साहित्य संमेलने आयोजित करत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची आणि साहित्य

संघाच्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच श्री. भारत सासणे यांचा थोडक्यात परिचय करून दिला. त्यानंतर साहित्य संघाच्या अध्यक्षा श्रीमती अचला जोशी यांच्या हस्ते श्री. सासणे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. नारायण लाळे संपादित 'साहित्य' या त्रैमासिकाच्या नवीन अंकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्याध्यक्ष प्रा. उषा तांबे यांनी सासणे यांच्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेतला आणि प्रा. नरेंद्र पाठक यांनी सासणे यांची मुलाखत घेतली. रंगलेली ही मुलाखत जवळपास दीड तास चालली. विचारलेल्या अनेक प्रश्नांना उत्तरे देताना श्री. सासणे म्हणाले, 'साहित्य संमेलनात साहित्याव्यतिरिक्त चर्चा होऊ नये असा प्रयत्न सगळ्यांचाच असतो. महामंडळाचाही यंदा तोच प्रयत्न असेल. त्यासाठी निवडलेले विषय हे महत्त्वाचे ठरतात. त्यावरून चर्चा कशी असावी हे पाहिले जाते. राजकीय किंवा अन्य विषय शक्यतो संमेलनात असू नयेत याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. संमेलनाध्यक्ष म्हणून दहा महिन्याच्या कालावधीत मी जिथे गरज असेल तिथे जाणार आणि मार्गदर्शन करणार आहे तसेच साहित्य संस्थांना कशी मदत करता येईल याचा सरकार दरबारी पाठपुरावा करणार आहे.' श्री. सासणेंनी लिहिलेले साहित्य, कथा, दीर्घकथा, बालसाहित्य, लेखनाच्या कार्यशाळेप्रमाणे वाचनाची कार्यशाळा व्हायला हवी. राजकीय कादंबरी अद्याप न होण्याचे कारण, आजची तरुणाई आणि साहित्य असे अनेक विषय मुलाखतीतून उलगडले. शेवटी साहित्य महामंडळाच्या कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी आभारप्रदर्शन केले.

**– अशोक बेंडखळे**
कार्यवाह–साहित्यशाखा

## श्रद्धांजली

कवयित्री रजनी परुळेकर
शिवकुमार शर्मा
चित्रकार रवी परांजपे
प्रदीप भिडे
माईसाहेब तथा कृष्णाबाई नारायण सुर्वे

## साभार पोच

- **दिवसा शास्त्रज्ञ रात्री लेखक**

संकलन/संपादन – बेसिलव सॅण्ड्रा रुमाव
रिअल इमेज पब्लिकेशन
मुखपृष्ठ – ब्रेन्सा

- **टाकसाळ निर्माण**

उदय कुलकर्णी, तुळजा प्रकाशन
मुखपृष्ठ – मनोज आचार्य, मूल्य रु. ५०/–

- **मेलुहा सभ्यतेचा शोध**

नितिन भरत वाघ, आऱ्हान बुकस्मिथ प्रकाशन
मुखपृष्ठ – आऱ्हान मेडिआस्मिथ, मूल्य रु. १८००/–

- **गोदातटीचे कैलासलेणे**

(कै. नरहर कुरुंदकर स्मृतिग्रंथ)
संपादक : प्रा. रा.ब. माढेकर, प्रा. द.पं. जोशी, डॉ. सौ. नलिनी साधले
प्रकाशन : मराठी साहित्य परिषद – तेलंगणा राज्य
मुखपृष्ठ – नावडकर बंधू, पृष्ठ – ५९६, मूल्य रु. ९००/–

- **नवल**

प्रशांत बागड, पपायरस प्रकाशन
मुखपृष्ठ – गणेश विसपुते, पृष्ठ – ३५४, मूल्य रु. ४७५/–

- **मी सार्वकालिक सर्वत्र**

पी. विठ्ठल, गोल्डन पेज पब्लिकेशन
मुखपृष्ठ/मांडणी – प्रदीप खेतमकर, पृष्ठ – १४०, मूल्य रु. ३५०/–

- **बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर**

संगीता अरबुने, ग्रंथाली प्रकाशन
मुखपृष्ठ – सतीश भावसार, पृष्ठ – ६६, मूल्य रु. १००/–

- **सोप्पंय सगळं**

देविदास चौधरी, कॉपर कॉइन प्रकाशन
मुखपृष्ठ – यशवंत देशमुख, पृष्ठ – ९६, मूल्य रु. २५०/–

# मुंबई मराठी साहित्य संघ


**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्री अभिजित गजेंद्रगडकर,
श्री. अभय भालेराव

**अध्यक्ष** : श्रीमती अचला जोशी

**उपाध्यक्ष** : श्री. माधव खाडिलकर, श्री. अशोक कोठावळे,
श्री. गंगाराम गवाणकर, श्रीमती रजनी जोशी,
डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. जयंत सावरकर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर,
प्रा. प्रतिभा बिश्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. नरेंद पाठक,
श्री. प्रमोद पवार, प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. दिलीप भाटवडेकर, श्रीमती शकुंतला मुळ्ये,
श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर,
डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. रोहिदास पांगे,
श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलेजा म्हात्रे, श्री. मनोहर सोमण,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे,
डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस,
श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत,
श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे,
श्री. दिवाकर नातू, श्री. ज्ञानेश पेंढारकर

**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर

**सन्माननीय सल्लागार** : श्री. जयराज साळगावकर, श्री. दिनकर गांगल, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. अश्विनी भालेराव गांधी,
श्री. सुभाष भागवत, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. प्रमोद पवार,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. रोहिदास पांगे,
श्री. सुधीर ठाकूर, श्री. एकनाथ आव्हाड

# तिसऱ्या पिढीचे आत्मकथन

# २

संपादन

उज्ज्वला मेहेंदळे






मराठी भाषेविषयी आस्था असणा-या प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायलाच हवा असा ग्रंथ.
मुंबई मराठी साहित्य संघाचे अष्टदशकपर्वातील प्रकाशन.

## इये मराठीचिये नगरी.

संपादनः अशोक बेंडखळे,डॉ.उज्ज्वला मेहेंदळे
प्रस्तावनाःमधू मंगेश कर्णिक

संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत एकनाथ,मुस्लिम संत,
स्वा.सावरकर,ब्रिटिश राजवट,कुसुमाग्रज,बहिणाबाई
आणि शिलालेख यांचे मराठी भाषेला योगदान.

सहभागी लेखकः व्याख्याते डॉ.सुधाकर देशपांडे,
डॉ.अरुण टिकेकर,डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी,
प्रा. म.रा.जोशी,विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर,
ज्यो.जयंतराव साळगावकर,डॉ.निशिकांत मिरजकर,
डॉ.द.ता.भोसले

प्रकाशकः मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोनः२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६